रविवार, १७ जुलै २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक ३६०
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

**अंतरंग**

शिवसेनेला गळती सुरूच; नगरसेवक शिंदे गटात/२
अर्थविषयक घडामोडींचा वेध घेणारे सदर अर्थ प्रहर/४
कर्जत येथे जिल्हा कॅरम निवड चाचणी स्पर्धा/८

## जगदीप धनखड एनडीएचे उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार



**नवी दिल्ली** : उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडून (एनडीए) शेतकरी परिवारातील सुपूत्र जगदीप धनखड यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. धनखड हे सध्या पश्चिम बंगालचे राज्यपाल आहेत. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी ६ ऑगस्टला मतदान होणार आहे, तर १९ जुलैपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येईल. विद्यमान उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांचा कार्यकाळ येत्या ११ ऑगस्ट रोजी संपत आहेत. उपराष्ट्रपतिपदाचा उमेदवार ठरविण्यासाठी भाजप मुख्यालयात पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, अध्यक्ष जेपी नड्डा, केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत उपराष्ट्रपतिपदासाठी राजस्थानचे जगदीप धनखड यांचे नाव निश्चित करण्यात आले.

### औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर, उस्मानाबादचे धाराशिव नामकरण

# नामांतरावर शिक्कामोर्तब

### नवी मुंबई विमानतळाचे लोकनेते दि. बा. पाटील विमानतळ नामकरण

**मुंबई : प्रतिनिधी**

औरंगाबाद शहराचे नाव छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबाद शहराचे नाव धाराशिव करण्याबाबतच्या प्रस्तावास शनिवारी (दि. १६) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नामकरण करण्याचा निर्णयही मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

औरंगाबाद शहराचे छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबाद शहराचे धाराशिव नामकरण करण्याबाबतच्या प्रस्ताव मंजुरीचे २९ जून रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीचे कार्यवृत्त मान्यतेसाठी नव्याने स्थापन झालेल्या मंत्रिमंडळासमोर आणण्यात आले होते. त्यावर हे दोन्ही प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी फेरसादर करावेत, असे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार हे प्रस्ताव शनिवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत फेरसादर करण्यात आले. या दोन्ही प्रस्तावांना मंत्रिमंडळाने मान्यता दिली. संबंधित प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात येऊन त्यानंतर विभाग, जिल्हा, तालुका तसेच महापालिका व नगरपालिका यांचे नामांतर करण्यात येईल. याबाबतची कार्यवाही स्वतंत्रपणे महसूल व वन विभाग तसेच नगरविकास विभागाकडून अधिनियमांप्रमाणे करण्यात येणार आहे. **(पान २ वर..)**

## ‘दिबां’च्या कार्याचा गौरव -आमदार प्रशांत ठाकूर



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयावर भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आणि लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ‘पनवेल तालुक्यात होणाऱ्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नाव देण्याचा ठराव राज्य मंत्रिमंडळाने आज केला. त्याबद्दल मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनापासून आभार व्यक्त करतो. दि. बा. पाटीलसाहेब हे भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्त या सर्वांसाठी लढले आणि त्यांचे नेतृत्व करीत त्यांच्या जीवनाला ‘दिबां’नी नवी दिशा दिली. ‘दिबां’च्या या कार्याचा गौरव करीत आज महाराष्ट्र सरकारने निर्णय घेतला आहे. लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाने आम्ही जी संघर्ष समिती स्थापन केली त्याला गेल्या संपूर्ण वर्षभरात ठाणे, रायगड, पालघर, मुंबई या सर्व जिल्ह्यांतील भूमिपुत्रांनी प्रचंड साथ दिली. त्या सगळ्यांच्या मागणीचा रेटा तयार झाला आणि त्यानंतर राज्य सरकारने आज निर्णय घेतला. त्याबद्दल मी पुन्हा एकदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनापासून आभार मानतो. लवकरात लवकर या ठरावाची अंमलबजावणी व्हावी यासाठी आपण सारे पाठपुरावा करीत राहू,’ असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले आहे.

## सर्वपक्षीय कृती समितीने मानले मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे आभार





(छाया : अमित जाधव)

**पनवेल** : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शिंदे-फडणवीस सरकारने शनिवारी मंत्रिमंडळ बैठकीत घेऊन लाखो भूमिपुत्रांचा सन्मान केला. त्याबद्दल लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेऊन त्यांचे आभार व्यक्त केले.

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील तत्कालीन सरकारने २९ जूनला ते सरकार अल्पमतात असताना घाईघाईने काही निर्णय घेतले होते. यात नामांतराचेही निर्णय होते, मात्र या निर्णयांबाबत पुढे जाऊन काही कायदेशीर अडचणी निर्माण होऊ नयेत म्हणून हे प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी फेरसादर करावेत असे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार ते शनिवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत फेरसादर करण्यात आले व त्याला मंत्रिमंडळाने मान्यता दिली. शनिवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेत शेतकरी, भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्तांचा सन्मान केला. त्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

विमानतळ नामकरणाचा निर्णय जाहीर झाल्यानंतर लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. या वेळी समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, पनवेलचे माजी उपमहापौर जगदिश गायकवाड, गुलाब वझे, जे. डी. तांडेल, राजेश गायकर, दीपक म्हात्रे, विनोद म्हात्रे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## ऐतिहासिक निर्णय -लोकनेते रामशेठ ठाकूर

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा अतिशय चांगला आणि ऐतिहासिक निर्णय आज महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. सर्व प्रकल्पग्रस्तांच्या दृष्टिने अतिशय महत्त्वाचा व आनंदाचा निर्णय त्यांनी घेतलेला आहे, असे या वेळी लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले.

लोकनेते रामशेठ ठाकूर पुढे म्हणाले की, रायगड, ठाणे, मुंबई, पालघर जिल्ह्यांतून भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्त, सर्व जाती-धर्मांच्या लोकांनी, सर्वपक्षीयांनी दि. बा. पाटीलसाहेबांचे नाव आंतरराष्ट्रीय विमानतळाला द्यावे असा आग्रह धरला होता. शेतकऱ्यांचे लढवय्ये नेते, दोन वेळा खासदार, पाच वेळा आमदार आणि विरोधी पक्षनेते म्हणूनही ‘दिबा’साहेबांनी महाराष्ट्रात जे काम केले त्याला तोड नाही. त्यांनी आमच्यामध्ये ऊर्जा, स्वाभिमान, अस्मिता जागृत केली. त्यामुळे त्यांचे नाव त्यांच्या भूमीत होणाऱ्या विमानतळाला द्यावे अशी सर्वांची इच्छा होती आणि त्या दृष्टीने आम्ही गेले वर्ष-दीड वर्ष संघर्ष करीत होतो. त्यांचे नाव देण्याकरिता २००८पासूनची मागणी होती. आज ते आमचे स्वप्न पूर्ण होतंय. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आम्ही आभार मानतो.



# रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासाठी आता स्वतंत्र यंत्रणा

## ■ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रशासनाला आदेश; अधिकारी नियुक्त करण्याच्या सूचना



**मुंबई: प्रतिनिधी**

दरवर्षी पावसाळ्यामध्ये रस्त्यांवरील खड्ड्यांची महाराष्ट्रभर चर्चा होत असल्याचे आत्तापर्यंत दिसून आले आहे. मात्र, खड्ड्यांच्या बाबतीत अद्याप कोणताही ठोस तोडगा काढण्यात कोणत्याही सरकारला यश आलेले नाही. यंदादेखील महाराष्ट्रात अनेक ठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य पसरलेले पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात नव्याने स्थापन झालेल्या शिंदे सरकारकडून महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. शिंदे सरकारने खड्ड्यांच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्यांच्या नियुक्तीचे आदेश दिले आहे.

याबाबत अधिक वृत्त असे की, खड्ड्यांसंदर्भात उपाययोजनेसाठीचे महत्त्वाचे पाऊल म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खड्डे बुजविण्यासाठी एमएमआरडीए आणि एमएसआरडीसी या दोन यंत्रणांनी स्वतंत्र असे अधिकारी नियुक्त करावेत, असे आदेश दिले आहेत. या अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील यंत्रणा चोवीस तास खड्डे बुजवण्याचे काम करेल. खड्डे दर्जेदार व्हावेत अशी सामुग्री वापरून रेडीमिक्स पद्धतीने भरण्यात यावेत. नियुक्त अधिकाऱ्यांची ही टीम रस्ते कोणत्या यंत्रणेचे हे न पाहता खड्डे भरेल. त्यासाठीचा खर्च संबंधित यंत्रणेकडून घेण्यात यावा. तसेच वेळेत आणि चांगल्या पद्धतीने रस्त्यांवरील खड्डे बुजविले जातील, याची काळजी घ्यावी. वाहतुकीची कोंडी आणि खड्डे यातून लोकांना दिलासा देण्यासाठी काम करा. रस्ता कुणी केला हे लोकांना माहीत नसते. त्यामुळे रस्त्यांची दुरवस्था होऊ नये यासाठी प्रयत्न करा. खड्ड्यांबाबत वाहतूक पोलिसांना चांगली माहिती असते. त्यासाठी खड्डे बुजवण्यासाठी पोलिसांकडून माहिती घेत राहा. पोलिसांनीही या यंत्रणाच्या संपर्कात राहून रस्ते खड्डे मुक्त करण्यासाठी प्रयत्न करावेत, असेदेखील मुख्यमंत्री यांनी संबधितांना बजावले आहे. याबरोबरच वाहतूक कोंडी दूर व्हावी यासाठी रस्ते विकास प्रकल्प अर्थात रोड डेव्हलपमेंट प्रोजेक्ट राबविण्यात यावा. त्यासाठी दीर्घकालीन असे नियोजन करण्यात यावे. यासाठी एमएमआरडीएने पुढाकार घ्यावा. बायपास, फ्लायओव्हर, अंडरपास, सर्व्हिस रोड अशा सर्व प्रकारच्या नियोजनासाठी तज्ज्ञांकडून आराखडा तयार करून घेण्यात यावा. यासाठी आवश्यक तिथे भूसंपादन आणि स्थानिक मुद्दे विचारात घेऊन जिल्हाधिकारी, संबंधित महापालिका आयुक्तांनीही सहकार्य करावे, असेही निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

## एमएमआरडीएच्या प्रकल्पांसाठी बँक कर्जाला शासनाकडून हमी

**मुंबई : प्रतिनिधी**

एमएमआरडीएला मुंबई महानगर क्षेत्रात विविध प्रकल्प राबविण्यासाठी ६० हजार कोटींपर्यंतचे कर्ज उभारण्यास तसेच शासन हमीस आज शनिवारी (१६) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. दरम्यान, या कर्जापैकी पहिल्या टप्प्यात उभारण्यात येणाऱ्या १२ हजार कोटी रकमेची शासन हमी देण्यास आणि शासन हमीवरील मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबई महानगर क्षेत्रात १ लाख ७४ हजार ९४० कोटी किंमतीचे महत्त्वाकांक्षी पायाभूत प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. यामध्ये विविध मेट्रो रेल प्रकल्प, बोरीवली-ठाणे भुयारी मार्ग, ठाणे कोस्टल रोड व शिवडी वरळी कनेक्टर, इत्यादी महत्वाच्या प्रकल्पांचा समावेश आहे. प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आलेल्या या प्रकल्पांना निधी उपलब्ध होऊन प्रकल्प विहित वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने हे निर्णय घेण्यात आले.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमातील कलम २१ नुसार शासनाची पूर्वमान्यता घेण्याची तरतूद विचारात घेता महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्राधिकरणास आवश्यकतेनुसार ६० हजार कोटी पर्यंतचे कर्ज उभारण्यास शासनाची मान्यता देण्यात आली.

## अतिवृष्टीमुळे रद्द झालेल्या मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा १८, १९ जुलैला

**मुंबई : प्रतिनिधी**

हवामान विभागाने जारी केलेल्या रेड आणि ऑरेंज अलर्टच्या पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठाने १४ आणि १५ जुलैला होणाऱ्या सर्व विभागांच्या परीक्षांना स्थगिती दिली होती. या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या होत्या. या दोन दिवसात तितक्या तीव्रतेचा पाऊस पडला नाही. याशिवाय हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार पुढच्या दोन दिवसात राज्यातील पाऊस उसंत घेणार आहे. त्याची तीव्रता कमी होणार आहे. त्यामुळे मुंबई विद्यापीठाने रद्द केलेल्या परीक्षा १८ आणि १९ जुलैला घेण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई विद्यापीठाने याबाबत परिपत्रक जारी करत माहिती दिली आहे.

मुंबई विद्यापीठाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, अतिवृष्टीमुळे मुंबई विद्यापीठाने १४ जुलैच्या सर्व परीक्षा रद्द केल्या होत्या. या परीक्षा १८ आणि १९ जुलैला होणार आहेत. इंजिनिअरिंग, फार्मसी आणि एमएस्सी फायनान्स या परीक्षेच्या ९ विषयांची परीक्षा होणार आहे. या परीक्षेची केंद्रे यापूर्वी जी होती तीच राहणार आहेत. कम्युनिकेशन स्किल्स, प्रोफेशनल कम्युनिकेशन एथिक्स, फायनान्शियल अकाउंटिंग अँड मॅनेजमेंट, इंटरप्रेन्युअरशीप मॅनेजमेंट, बिझनेस इन्फ्रास्ट्रक्चर अँड मॅनेजमेंट, ईआरपी, एथिक्स अँड सीएसआर, फिक्स्ड इन्कम सेक्युरिटीज या विषयांच्या परीक्षा सोमवार१८ जुलैला होणार आहेत. तर क्लिनिकल इम्युनोलॉजी अँड इम्युनोपॅथॉलॉजी या विषयाची परीक्षा मंगळवारी १९ जुलैला होणार आहे.

या परीक्षेच्या तारखेसंदर्भात समाजमाध्यमात काही चुकीचे संदेश पसरत आहेत. त्याकडे विद्यार्थ्यांनी दुर्लक्ष करावे आणि विषयांच्या तारखेबाबत विद्यापीठाचे संकेतस्थळ व आपल्या संबंधित महाविद्यालयाशी संपर्क साधावा, असे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. विनोद पाटील यांनी सांगितले.

## ओबीसी लोकसंख्येबाबत आक्षेप असल्यास पुन्हा सर्वेक्षण

### ■ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन



**मुंबई : प्रतिनिधी**

माजी मुख्य सचिव जयंतकुमार बांठिया आयोगाने केलेल्या सर्वेक्षणानुसार ओबीसींच्या लोकसंख्येबाबत काही आक्षेप असल्यास पुन्हा सर्वेक्षण किंवा अभ्यास करण्यास राज्य सरकार तयार आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पेट्रोल-ड़िझेलचे दर अजून कमी करण्याचा निर्णय राज्य सरकार लवकरच घेईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बांठिया आयोगाने राज्यातील ओबीसींची लोकसंख्या ३७ टक्के असल्याचा निष्कर्ष सर्वेक्षणानंतर काढला आहे. त्यामुळे ओबीसी समाजात असंतोष असून हा अहवाल राज्य सरकारने फेटाळून लावावा, अशी मागणी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी केली आहे. याविषयी विचारता फडणवीस म्हणाले, ज्यांना ओबीसींना राजकीय आरक्षण द्यायचे नाही, ते या अंतिम टप्प्यात जाणीवपूर्वक अडथळे आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. ज्या सरकारच्या कार्यकाळात हा आयोग झाला, त्याच पक्षांचे नेते आज वेगळी भूमिका घेऊन अहवालाला विरोध करीत आहेत. बांठिया आयोगाचा अहवाल हा ओबीसींच्या राजकीय आरक्षणापुरता असून त्यांना २७ टक्के राजकीय आरक्षण देण्याची शिफारस आयोगाने केली आहे. पण आयोगाने निश्चित केलेल्या अंतिम लोकसंख्येबाबत कोणाचे काही मत असेल, तर आणखी सर्वेक्षण किंवा अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारची नेहमीच तयारी आहे असेही उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

दरम्यान, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या निवासस्थानी जाऊन फडणवीस यांनी शुक्रवारी (दि. १५) त्यांची भेट घेतली. त्याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली. मात्र राज ठाकरे यांच्यावर शस्त्रक्रिया झाल्याने ही भेट घेतली व त्याबाबत विधिमंडळातच मी जाहीर केले होते. अन्य पक्षातील राजकीय नेत्यांशी संबंध ठेवणे, ही महाराष्ट्राची संस्कृती आहे. मी राज ठाकरे यांना भेटल्याने कोणालाही मळमळ होण्याचे कारण नाही, असा टोलाही त्यांनी विरोधकांना लगावला.



## ‘गृहनिर्माण संस्था हे एक कुटूंब’

पनवेल : रामप्रहर वृत्त

गृहनिर्माण संस्था हे आपले कुटुंब आहे. सभासदांनी एकमेकांशी जिव्हाळ्याची वागणूक ठेऊन एकमेकांना समजून घेऊन वाद तक्रारी न करता प्रश्न सामंजस्याने सोडवले तर सकारात्मक ऊर्जा राहते. वातावरण खेळीमेळीचे व ताणविरहित राहते असे प्रतिपादन शाश्वत वेल्फेअर फाउंडेशनच्या संचालक नीता सुर्वे यांनी केले.

जनजागृती ग्राहक मंच रायगड शाखा पनवेल व के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारच्या पूर्वसंध्येला के.गो.लिमये सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात आयोजित केलेल्या व्याख्यानाच्या निमित्ताने सुर्वे बोलत होत्या. गृहनिर्माण संस्था, व्यवस्थापन व समस्या या विषयावरील मार्गदर्शनपर भाषणाच्या संदर्भात त्यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यापुढे म्हणाल्या, गृहनिर्माण संस्थेची इमारत सभासदांपैकी एक प्रवर्तक नेमून बांधकाम करून किंवा विकासकामार्फत इमारतीचे बांधकाम करून संस्थेची नोंदणी करण्यात येते व कार्यकारिणीची निवड करून संस्थेच्या कार्यास सुरुवात होते. सुरुवातीलाच ख व ग नोंद वह्या ज्यामध्ये सभासदांचा समग्र तपशील असतो, त्या तयार कराव्यात. तसेच वेळोवेळी त्या अद्ययावत ठेवाव्यात. सभासदांच्या तक्रारी संस्थेच्या पातळीवरच सोडवाव्यात. ज्येष्ठ सभासदांनी तरुणांना वाव देऊन स्वतः मार्गदर्शन करावे असेही त्या म्हणाल्या. उपस्थितांच्या प्रश्नांना नीता सुर्वे यांनी समर्पक उत्तरे दिली. कार्यक्रमाचे प्रास्तविक वाचनालयाचे अध्यक्ष सुनीता जोशी यांनी केले. वक्त्यांचा परिचय जनजागृती ग्राहक मंचाचे सचिव बी.पी. म्हात्रे यांनी करून दिला. संस्थांची माहिती जनजागृती ग्राहक मंचाचे अध्यक्ष काशिनाथ जाधव यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अ‍ॅड. माधुरी थळकर यांनी केले.

## रोहा-चिपळूण मार्गावर गणपतीसाठी धावणार ‘मेमू’

**मुंबई : प्रतिनिधी**

गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्या प्रवाशांसाठी मध्य आणि कोकण रेल्वेने रोहा-चिपळूण मेमू गाडी चालवण्याचा निर्णय घेतला आहे, पण आठ डब्यांच्या या गाडीलाही गर्दी होण्याची शक्यता असल्याने त्याला आणखी चार डबे जोडून ती एकूण बारा डब्यांची चालवण्याचा निर्णय घेतला आहे. गाडी क्रमांक ०११५७ आणि ०११५८ ही गाडी १९ ऑगस्टपासून बारा डब्यांची असेल, अशी माहीती कोकण रेल्वेकडून देण्यात आली. या गाडीच्या एकूण ३२ फेऱ्या होणार आहेत.

मेमू माणगाव, वीर, करंजाडी, विन्हेरे, खेड स्थानकात या गाडीला थांबा असेल. रोहा ते चिपळूण अवघ्या ९० रुपयांत प्रवास करता येणार आहे. दरम्यान, यंदा कोकणात जाणाऱ्यांची गर्दी लक्षात घेता मध्य आणि कोकण रेल्वेबरोबरच पश्चिम रेल्वेकडूनही विशेष फेऱ्या चालवण्यात येणार आहेत.

## इंदापूर येथे कोकण रेल्वेच्या धडकेने मुलीचा दुर्दैवी मृत्यू

**माणगाव** : तालुक्यातील इंदापूर गावच्या हद्दीत कोकण रेल्वेमार्गावर मुंबई बाजूकडून माणगाव बाजूकडे जाणाऱ्या रेल्वेगाडीच्या धडकेने एका १७ वर्षीय मुलीचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी (दि. १६) सकाळी ९.५८ वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबतची खबर पोलीस शिपाई राकेश श्रीकीशन विजय यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली. राजेश्री चंद्रकांत जाधव (वय १७, रा. सहकार नगर, इंदापूर) असे मयत मुलीचे नाव असून रेल्वे ट्रॅकवर आल्याने तिला रेल्वेगाडीची धडक लागली. यामुळे गंभीर स्वरूपाच्या दुखापती होऊन त्यात तिचा मृत्यू झाला.

## शिवसेनेत गळती सुरूच

### रत्नागिरी, बदलापुरातील नगरसेवक शिंदे गटात

**रत्नागिरी, बदलापूर : प्रतिनिधी**

एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेनेच्या ४० आणि अपक्ष आमदारांनी केलेल्या बंडानंतर राज्यातील महाविकास आघाडी सरकार कोसळले. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी सरकार स्थापन केल्यापासून शिवसेनेला अनेक धक्के बसले आहेत. आमदारांपाठोपाठ अनेक ठिकाणचे नगरसेवकही शिंदे गटात सामील होत आहेत. या पार्श्वभूमीवर रत्नागिरीमधूनही काही नगरसेवक शिंदे गटात सामिल होत आहेत. तर बदलापूरच्या सर्वच नगरसेवकांनी शिवसेनेला रामराम केला आहे.

दापोली नगरपंचायत निवडणुकीत शिवसेनेचे आमदार योगेश कदम समर्थक म्हणून निवडून आलेले तीन नगरसेवक शिंदे गटात सामील होणार असल्याचे वृत्त पुढे येत आहे. आम्ही शिवसैनिकच असल्याचा दावा त्यांच्याकडून वेळोवेळी करण्यात आला आहे. दापोली मंडणगड नगरपंचायतीचे शिवसेना बंडखोर नगरसेवक आमदार योगेश कदम यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटले. दरम्यान, प्रताप सरनाईक यांच्या पाठोपाठ उदय सामंतही आता तयारीत असून या मुळे कोकणात सेनेला मोठे खिंडार पडणार असल्याची शक्यता बोलून दाखविली जात आहे. दापोली नगरपंचायत निवडणुकीत एबी फॉर्म देण्यावरून शिवसेनेत अंतर्गत कलह उफाळून आला होता. जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री अनिल परब यांनी दापोली नगरपंचायतीची धुरा माजी आमदार सूर्यकांत दळवी यांच्याकडे सोपवली होती. त्यामुळे नाराज शिवसेना आमदार योगेश कदम समर्थकांनी नगरपंचायत निवडणुकीत स्वतंत्र पॅनल उभे केले होते, मात्र या पॅनलला फारसे यश आले नव्हते. परंतु आमदार योगेश कदम समर्थकांच्या तीन सीट निवडून आल्या होत्या. आता दापोली नगरपंचायतीचे तीन नगरसेवक, तर मंडणगड नगरपंचायतीचे सात नगरसेवक असे मिळून १० नगरसेवक शिंदे गटात सामील झाले आहेत.

दरम्यान बदलापुरातील सर्वच्या नगरसेवकांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे. त्यामुळे शिवसेनेला हा जबरदस्त धक्का समजला जातोय. शिवसेनेने आमदारांच्या बंडानंतर बैठकांचा सपाटा लावलाय, मात्र या बैठका निष्फळ ठरत असल्याचे सध्याच्या राजकीय घडामोडींवरून स्पष्ट झाले आहे. बदलापुरातील २५ नगरसेवकांनी शहरप्रमुख वामन म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची नंदनवर बंगल्यावर भेट घेतली. या वेळी मुख्यमंत्र्यांनी या नगरसेवकांचे पुष्पगुच्छ देत आपल्या गटात स्वागत केले. नगरसेवकांसह अनेक पदाधिकाऱ्यांनीही प्रवेश केला. त्यामुळे शिवसेनेला जबर धक्का बसला आहे. तसेच या नगरसेवकांव्यतिरिक्त ठाणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पुष्पा पाटील, उपाध्यक्ष सुभाष पवार, अंबरनाथ पंचायत समिती सभापती अनिता निरगुडा, तालुकाप्रमुख बाळाराम कांबरी हेही शिंदे गटात सहभागी झाले आहेत.

पान १ वरून

## नामांतरावर शिक्कामोर्तब

याचबरोबर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नामकरण करण्याबाबत प्रस्तावाच्या मंजुरीचे मंत्रिमंडळ बैठकीचे कार्यवृत्त मान्यतेसाठी नव्याने स्थापन झालेल्या मंत्रिमंडळासमोर आणण्यात आले होते. त्यावर हा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी फेरसादर करावेत असे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार हा प्रस्ताव शनिवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत फेरसादर करण्यात आला व त्यालाही मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांच्या मागणीनुसार १२.५% योजनेच्या अंमलबजावणीसाठी लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे योगदान आहे. तद्नंतर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी संपादित जमिनीसाठी मोबदला ठरवावयाच्या अनुषंगाने निश्चित करण्यात आलेले २२.५% योजनेचे धोरणसुद्धा १२.५% धोरणाच्या धर्तीवर तयार करण्यात आले आहे. सिडको महामंडळाच्या माध्यमातून पनवेल तालुक्यात ११६० हेक्टर क्षेत्रावर सार्वजनिक खासगी भागीदारीतून नवी मुंबई ग्रीनफील्ड विमानतळ विकसित करण्यात येत आहे. या संपूर्ण ११६० हे. जमिनीचे संपादन पूर्ण झाले असून विमानतळ प्रकल्पाची भूविकास कामे प्रगतिपथावर आहेत. या विमानतळाच्या नामकरणाच्या अनुषंगाने लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समिती व इतर संघटनांकडून मागणी करण्यात येत होती.

नवी मुंबई परिसरातील विकासामध्ये असलेले लोकनेते दि. बा. पाटील यांचे योगदान आणि स्थानिकांच्या संघटनांची मागणी विचारात घेता नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असे करण्यास शनिवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. या सर्व निर्णयांबद्दल मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे अभिनंदन व आभार व्यक्त केले जात आहेत.

## महामेट्रोचे डॉ. दिक्षित यांना जीवन गौरव पुरस्कार

**नागपूर : प्रतिनिधी**


पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल इंडियन इन्स्टिटयूशन ऑफ ब्रीज इंजिनिअर्सच्या (आयआयबीई) वतीने महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.ब्रिजेश दिक्षित यांना शुक्रवारी मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात प्रतिष्ठेचा ‘जीवन गौरव’ (लाईफ टाईम अचिव्हमेंट) पुरस्कार प्रदान करण्यात आला.




डॉ.दिक्षित यांना कन्सुमाचे व्यवस्थापकीय संचालक हर्षवर्धन सुब्बा राव यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. आयआयबीईचे अध्यक्ष विनय गुप्ता यांनी प्रशस्तीपत्रकाचे वाचन केले. या पुरस्काराचे श्रेय यांनी महामेट्रोच्या सहकाऱ्यांना दिले. तंत्रज्ञानातील बदल आणि नवीन तंत्रे येत असताना, आपण आपल्या पुढच्या पिढीला प्रशिक्षण देणे, बदलांसाठी तयार करणे अत्यावश्यक आहे, असे दिक्षित म्हणाले. महामेट्रोचे संचालक (प्रकल्प) महेश कुमार यांनी नागपूर मेट्रो प्रकल्पाबाबत सादरीकरण केले.


## दुखवटा

### गोपाळ वर्तक



**उरण** : पनवेल तालुक्यातील नामांकित कृषीतज्ञ गोपाळ आलोजी वर्तक (८४) यांचे गोवठणे येथील राहत्या घरी निधन झाले आहे. त्यांच्या अचानक जाण्याने कुटुंबातील कर्ता हरपल्याने कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. दरम्यान, उरण व पनवेल तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कृषी क्षेत्राला संजीवनी देणारे गोपाळ वर्तक यांनी ग्रामीण विभागात शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून दिला आहे. याशिवाय स्वतः कृषी अधिकारी म्हणून कार्यरत असताना अहोरात्र मेहनत घेऊन अनेक शेतकऱ्यांचे व्यवसाय वृद्धींगत करण्याचे काम केले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, दोन मुलगे, सुना, जावई, नातवंडे असा त्यांचा मोठा परिवार आहे.

### सिंधू म्हसकर



**कर्जत** : सिंधू राजाराम म्हसकर यांचे शनिवारी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. नेरळ येथील ग्रा. पं. चे उपसरपंच आणि भारतीय जनता पक्षाचे कर्जत तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर यांच्या त्या मातोश्री होत. दरम्यान, सिंधू म्हसकर यांचे पती राजाराम म्हसकर यांचे चार वर्षांपूर्वी निधन झाले होते. त्यांच्या पश्चात तीन पुत्र, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## नवी मुंबई विमानतळाला ‘दिबां’च्या नावाचा निर्णय

# भाजपतर्फे आभार आणि जल्लोष

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शिंदे-फडणवीस सरकारने शनिवारी (दि. १६) मंत्रिमंडळ बैठकीत घेऊन लाखो भूमिपुत्रांचा सन्मान केला आहे, त्याबद्दल भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तर रायगड जिल्हा भाजपच्या वतीने शनिवारी या निर्णयाचे स्वागत करून जल्लोष करण्यात आला.



पनवेल तालुका व शहर भाजप कार्यालय येथे उत्तर रायगड भाजपच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या नेतृत्वाखाली फटाक्यांची आतषबाजी आणि जयघोषात जल्लोष करण्यात आला. ‘दिबा’साहेबांचा विजय असो, ‘दिबा’साहेब अमर रहे, अशा गगनभेदी घोषणा देतानाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभारही मानण्यात आले.

या वेळी भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य राज पाटील, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, शिक्षक सेलचे जिल्हा संयोजक के. सी. पाटील, डॉक्टर सेलचे जिल्हा संयोजक डॉ. कृष्णा देसाई, निर्दोष केणी, मधुकर उरणकर यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

> **समितीने उभारलेले आंदोलने, मागणीचा रेटा आणि त्या अनुषंगाने तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासोबत नामकरणासंदर्भात दोन वेळा बैठक झाली, मात्र उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेबांच्या नावावर ठाम राहून आपला हेका कायम ठेवला आणि ‘दिबा’साहेबांचे नाव विमानतळाला देण्यास नकार दिला होता. सरकार अल्पमतात आल्यावर श्रेयासाठी उद्धव ठाकरे यांनी अवैध प्रकारे निर्णय घेतला होता, मात्र या निर्णयात कायदेशीर बाब अडसर ठरला असता. त्यामुळे शिंदे-फडणवीस सरकारने घाईघाईने नाही, तर भूमिपुत्रांच्या भावनांचा विचार करून निर्णय घेतला आहे.**
> **-अरुणशेठ भगत,**
> **पनवेल तालुका भाजप अध्यक्ष**

**खारघर : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शनिवारी झाल्याने खारघरमधील भाजप कार्यालयाबाहेर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ‘दिबां’च्या नावाचा जयघोष करून जल्लोष केला. या वेळी मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी स्थायी समिती सभापति नरेश ठाकुर, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, रामजी बेरा, प्रवीण पाटील, गुरुनाथ गायकर, युवा नेते समीर कदम, जिल्हा चिटणीस गीता चौधरी, उपाध्यक्षा महिला मोर्चा संध्या शारबिद्रे, युवा मोर्चा सरचिटणीस अमर उपाध्याय, युवा मोर्चा उपाध्यक्ष शुभ पाटील, ज्येष्ठ नागरिक सेलचे संयोजक नवनीत मारू, शैलेंद्र त्रिपाठी, जी. एन. गुप्ता, संदीप एकबोटे आदी उपस्थित होते.**





**कामोठे : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा मंत्रिमंडळात ठराव मंजूर झाला. त्याबद्दल भाजप कामोठे शहर मंडल, महिला मोर्चा, युवा मोर्चा शक्ती केंद्र, बूथ अध्यक्ष त्याच सोबत सर्व भाजप कार्यकर्ते यांनी शनिवारी आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालय सेक्टर ३६ येथे या आनंदाचा जल्लोष केला. या वेळी मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, सरचिटणीस सुशील शर्मा, शरद जगताप, महिला मोर्चा अध्यक्ष वनिता पाटील, युवा मोर्चा शहर अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ संघर्ष समितीचे राजेश गायकर, कामोठे जनसंपर्क अधिकारी अमित रोकडे यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका, अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**



# पावसाचा फटका भाजीपाल्यालाही

## भाज्यांचे दर गडगडले

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई एपीएमसी मार्केटमध्ये गेल्या आठवड्यापासून भाजीपाल्याची आवक वाढली आहे. परिणामी भाज्यांचे दर कमी होऊ लागले आहेत. एपीएमसीमध्ये सध्या पाचशे ते साडेपाचशे गाड्यांची आवक होत आहे. यामुळे जवळपास ३० ते ४० टक्क्यांनी भाजीपाला दर उतरले आहेत.

काही दिवसांपूर्वी तब्बल प्रतिकिलो शंभरी गाठलेला टोमॅटो आता २० ते २५ रुपये किलो दराने विकला जात आहे. तर मेथीचे दरही उतरले आहेत. मेथीच्या एका जुडीसाठी आता दहा रुपये मोजावे लागत होते. एपीएमसी मार्केटमध्ये महाराष्ट्रामधील पुणे, अहमदनगर, नाशिक, सांगली जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात भाजीपाला येत आहे. त्याचबरोबर गुजरात, कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्यांमधून सुद्धा अनेक भाज्या दाखल होत आहेत.

आवक वाढली असतानाच मुंबईत गेल्या चार दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत असल्याने भाजीपाल्याला उठाव नाही. भाजीपाला खरेदी करण्यासाठी ग्राहक मोठ्या संख्येने येत नसल्याने भाजीपाला एपीएमसीत शिल्लक राहत आहे. याचाही फटका बसल्याने दर खाली आले आहेत.

कोथिंबीर, कोबी, फ्लॉवर, गावठी वांगे, टोमॅटो, गाजर, ढोबळी मिरची, कारले, पालक, कांद्याची पात, पालक आदी भाज्यांचे भाव कमी झाले आहेत. नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत आवक वाढल्याने भाजीपाल्याचे किरकोळ भाव कमी झाले. यामुळे सर्वसामान्य ग्राहक खुश झाला आहे; परंतु भाव घसरल्याने शेतकरी आणि भाजीविक्रेते चिंतेत आहे. काही दिवस हे दर असेच राहतील असे म्हटले जात आहे.



# पनवेलमध्ये रंगला भक्तिरंग कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येथील पनवेल शहर ज्येष्ठ नागरिक संघात गुरूपौर्णिमेनिमित्त भक्तिरंग कार्यक्रमाचे बुधवारी (दि.१३) आयोजन केले होते. दत्ता ढोले यांनी सादर केलेल्या श्री दत्तगुरू स्तवन स्तोत्राने कार्यक्रमाची सुरूवात झाली.

प्रथेप्रमाणे आठवड्यांतील सभासदांचे वाढदिवस साजरे करण्यात आले. उपाध्यक्षा माधुरी गोसावी यांनी पर्जन्य सहलीबाबत माहिती दिली. त्यानंतर संघाच्या भजनी महिला मंडळाचे गुरू (प्रशिक्षक) बुवा विकास कडू यांचा संघातर्फे पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यांत आला.

याच कार्यक्रमात संघाचे सभासद प्रमोद वनगे यांनी देणगी दाखल आणलेली साऊंड सिस्टीम संघाचे अध्यक्ष जयंत गुर्जर यांना सुपुर्द केली. या साऊंड सिस्टीमवर दत्ता ढोले यांनी दोन गीते सादर करून सिस्टीमची सुरूवात केली. त्यानंतर भजनीबुवा विकास कडू यांनी सुश्राव्य व कर्णमधुर अशी भजने सादर करून सभासदांना भक्तीरंगात गुंतवून ठेवले. संघाच्या भजनी महिलांनी त्यांना उत्तम साथ दिली. संवादिनीवर स्वतः बुवा होते. तबला साथ नंदू साठे, पखवाज साथ मोहन शिरोडकर यांनी केली तर तालवाद्यावर काळे यांनी साथ दिली.

भैरवीने भक्तिरंग कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाचे सुत्र संचालन सचिव सचीन खेडेकर यांनी प्रभावीपणे केले. पसायदान होऊन कार्यक्रम समाप्त झाला.

## संकष्ट चतुर्थीनिमित्त गणपती मंदिरांत गर्दी

**उरण : वार्ताहर**



संकष्ट चतुर्थीनिमित्त शनिवारी (दि. १६) उरण तालुक्यातील सर्व गणपती मंदिरांत भक्तांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. मंदिरा समोर दुर्वा, हार, नारळ, फुले यांची दुकाने थाटण्यात आली होती.

उरण शहरातील गणपती चौक येथील श्री गणपती देवस्थान महा मंदिरात भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. सकाळी ७.३० वाजता आरती करण्यात आली तर रात्री ९ वाजता महाआरती करण्यात आली, असे महा गणपती मंदिराच्या विश्वस्तांनी सांगितले.

उरण तालुक्यातील चिरनेर, उरण शहरातील गणपती चौक येथील गणपती मंदिर, विनायक येथील रिद्धी-सिद्धी विनायक, नागाव येथील गणेश मंदिर, मोरा येथील गणेश मंदिर, बोकडवीरा येथील गणेश मंदिर, सोनारी गणपती चौक उरण येथील गणेश मंदिर आदी ठिकाणी गणेश भक्तगण दर्शन घेत असल्याचे चित्र दिसत होते.

# पूर परिस्थितीच्या उपाययोजनांबाबत चर्चा



**उरण : वार्ताहर**

सतत पडणाऱ्या पावसामुळे रानसई धरण ओव्हर फ्लो झाले आहे. हे धरण पुर्णता भरल्यानंतर त्याचे पाणी सोडल्यावर व अतिवृष्टीमुळे कंठवली, विन्धानेव, बोरखार, चिरनेर, दिघोडे या गावात पूर येऊन आपत्कालीन परिस्थती निर्माण होऊ शकते. त्या अनुषंगाने उपाययोजनाबाबत चर्चा करण्यात आली.

यासाठी विंधणे चिरनेर, दिघोडे गावाचे सरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील, ग्रामपंचायत सदस्यांच्या विंधणे ग्रामपंचायत कार्यालयात बैठक घेऊन उपस्थितांना पुर परिस्थिती निर्माण झाल्यास, करावयाच्या उपाययोजना सांगण्यात आल्या. शासकिय यंत्रणाशी संपर्क साधणेबाबत मार्गदर्शन करून सूचना दिल्या.

या बैठकीत उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सुनील पाटील, निरीक्षक (गुन्हे) सुहास चव्हाण, एमआयडीसीचे असिस्टंट इंजिनिअर जालिंदर कुंभार, उपअभियंता रवींद्र चौधरी, तहसीलदार भाऊसाहेब अंधारे, जासई मंडळ अधिकारी एम. सी. जोशी, चिरनेर तलाठी के. डी. मोहिते, ग्रामसेवक आर. बी. गावंड आदी उपस्थित होते.









रुपयातून आंतरराष्ट्रीय व्यवहार करण्याची यंत्रणा म्हणजे

# आगामी आर्थिक संकटांना काबूत ठेवणारी ढाल

**रुपयातून आंतरराष्ट्रीय व्यवहार करण्याची यंत्रणा उभी करण्याचा धाडसी निर्णय भारताने नुकताच घेतला आहे. या निर्णयाचे दीर्घकालीन अनेक फायदे आहेत. पण जगापुढे नजीकच्या भविष्यात महागाई आणि डॉलरच्या वाढत्या मूल्याचे जे संकट उभे राहिले आहे, त्याला काबूत ठेवण्याची क्षमता भारताने त्यातून मिळविली आहे.**

अर्थ प्रहर



यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)

विकसित देश, विकसनशील देश आणि अविकसित देश असे जे जगाचे तीन भाग पडले आहेत, ते जगाच्या अर्थव्यवस्थेत कसे काम करतात, हे पाहिले तर विकसित देश चलनाच्या जोरावर गरीब देशांचे शोषण करतात, असे लक्षात येते. उदा. जगात आयात-निर्यातीसाठी अमेरिकन डॉलर वापरावा लागतो. डॉलर वापरून आज जगातील तब्बल ७४ टक्के व्यापार होतो. त्यामुळे डॉलरची मागणी जगभर वाढली आहे. साहजिकच डॉलरचे इतर चलनाच्या तुलनेत मूल्य वाढते. आज ८० रुपयांना एक डॉलर अशी जी परिस्थिती निर्माण झाली आहे, त्याचेही कारण हेच आहे. जागतिकीकरणामुळे सर्व देश आर्थिकदृष्ट्या आता इतके जोडले गेले आहेत आणि घटना घडामोडींना इतका वेग आला आहे की त्यांचे परस्परांवर लगेच परिणाम होतात. त्यामुळे भारताची अर्थव्यवस्था कितीही कार्यक्षमतेने काम करीत असली तरी अमेरिकेने डॉलर संदर्भात घेतलेले निर्णय भारताच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम करू लागतात. सध्या नेमके तेच झाले आहे. अस्थिर जागतिक आर्थिक परिस्थितीत भारताची अर्थव्यवस्था सुमारे सात टक्क्यांनी वाढते आहे. कधी नव्हे तेवढी निर्यात वाढली आहे. परकीय चलनाचा पुरेसा साठा आहे. अन्नधान्याची अजिबात टंचाई नाही, उलट गरजू देशांना भारत धान्य पुरविण्यास तयार आहे. गेल्या काही दिवसात चांगला पाऊस पडल्याने पाण्याची चिंता मिटल्यासारखीच आहे. अशा सर्व बाजूंनी भारत चांगल्या स्थितीत असूनही केवळ चलन मूल्याच्या फरकाने भारताच्या आर्थिक चिंता वाढल्या आहेत.

**डॉलर-अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न**

आंतरराष्ट्रीय व्यापारात रुपया वापरण्याचा रिझर्व बँकेने घेतलेला निर्णय या पार्श्वभूमीवर महत्त्वाचा आहे. या निर्णयाने लगेच मोठा फायदा होणार नसला तरी दीर्घकालीन विचार करता तो देशाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा निर्णय ठरणार आहे. त्याचे एक उदाहरण पाहिले की तो फायदा किती मोठा आहे, हे लक्षात येते. रशियाने युक्रेनवर हल्ला केल्यामुळे अमेरिकेसह युरोपीय देशांनी रशियावर अनेक निर्बंध लादले आहेत. त्यात व्यापारी निर्बंधांचाही समावेश आहे. त्यामुळे रशियाला सध्या डॉलरमध्ये व्यापार करता येत नाही. पण भारताने तटस्थ भूमिका घेतल्याने भारत रशियाशी व्यापार करतो आहे. विशेषतः इंधनाची गरज भागविण्यासाठी भारताने रशिया देत असलेले स्वस्तातील इंधन घेतले आहे. अमेरिकेचा दबाव झुगारून भारताने हे पाउल उचलले आहे. कारण इंधनाचे दर भडकल्यावर भारताची अर्थव्यवस्था संकटात सापडू शकते. सध्या भारत आपल्या गरजेच्या १० टक्के इंधन रशियाकडून घेतो. त्याची एका वर्षाची किंमत ३० ते ३६ अब्ज डॉलर एवढी होते. पण ही रक्कम आता भारत रुपयात देऊ शकणार आहे. ज्यामुळे परकीय चलनाच्या साठ्यातील ३६ अब्ज डॉलरची बचत होईल. गेल्या दोन तीन महिन्यात रुपयासह जगातील सर्व चलने डॉलरच्या तुलनेत घसरली आहेत. पण भारताचे चलन त्या तुलनेत कमी (पाच टक्के) घसरले आहे, कारण भारताचा परकीय चलन साठी ६०० अब्ज डॉलरच्या घरात होता. त्यातील ४० अब्ज डॉलर रुपया सावरण्यासाठी भारताला खर्च करावे लागले! आज ही बचत रशियाशी व्यापारापुरती मर्यादित असली तरी उद्या श्रीलंकेला मदत करताना किंवा इराणकडून इंधन घेताना जेव्हा रुपयाचा वापर केला जाईल, तेव्हा ही बचत आणखीच वाढेल. शिवाय पुढे जे करार होतील, त्यात रुपयातून व्यवहाराला सुरवात झाल्यास डॉलरवरील भारताचे अवलंबित्व काही प्रमाणात तरी कमी होण्यास सुरवात होईल.

**रुपयाचा निर्णय हे धाडस**

रशियाशी व्यापार चालूच ठेवण्याचा आणि आता तो रुपयात करण्याचा भारताचा हा निर्णय अतिशय धाडसी म्हणता येईल. कारण अमेरिकेची अर्थव्यवस्था डॉलरच्या मागणीवर अवलबून आहे. जगात जेव्हा डॉलरमधून विनिमय करण्यास आव्हान देण्यात आले, तेव्हा त्या देशाला अमेरिकेच्या रोषाला बळी पडावे लागले आहे. पण आता जागतिक व्यवस्था बदलली असून भारताचे अमेरिकेच्या व्यापारातील महत्त्व तसेच एकूणच जगातील महत्त्व वाढल्यामुळे अमेरिका भारताबाबत टोकाचा काही निर्णय घेण्याचा स्थितीत नाही.

या विषयात चीनने आधीच अमेरिकेला आव्हान दिल्याने भारताला दुखावण्याची चूक अमेरिका करणार नाही. महागाईमुळे अमेरिकाही सध्या त्रस्त असल्याने त्यात काही भर पडणार नाही, अशी काळजी तो देश घेणार, हे उघड आहे.



**व्यापारातील तूट कमी होईल**

बहुतांश आर्थिक आघाड्यांवर भारताची अर्थव्यवस्था मजबूत असताना आयात-निर्यात व्यापारातील तूट भारतासाठी त्रासदायक ठरत आहे. त्याचे कारण इंधन, कोळसा आणि सोन्याची आयात भारताला वाढवावी लागली आहे. जूनमध्ये ही तूट २५.६३ अब्जडॉलरवर गेली असून ती भारताच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे. ही तूट वाढली की सर्वच आर्थिक आघाड्यांवर त्याचे विपरीत परिणाम होतात. इंधनाचे दरही भारताच्या हातात नाहीत आणि डॉलरचा मूल्य तसेच साठाही भारताच्या हातातील बाब नाही. इंधनाच्या भडकलेल्या दरांवर रशियाचे इंधन घेण्याचा एक मार्ग भारताने काढला तसेच डॉलरच्या साठ्यात बचत करण्याचा मार्ग म्हणजे रुपया जागतिक व्यापारासाठी खुला करणे होय. या दोन्ही मार्गांनी भारताने देशातील इंधनाचे दर नियंत्रणात ठेवणे आणि डॉलरचा पुरेसा साठा जपून ठेवणे, या गोष्टी साध्य केल्या आहेत. एक प्रकारे जगापुढील महागाईचे संकट तसेच डॉलरचे मूल्य कमी अधिक होत असताना देशाच्या अर्थव्यवस्थेला बसणारे धक्के पचविण्याची क्षमता भारताने वाढविली आहे.



# अर्थव्यवस्थेच्या नव्हे-बाजाराच्या कलाकलाने गुंतवणूक?

**जगाच्या संदर्भाने भारतीय अर्थव्यवस्थेविषयी नेहमीच उलटसुलट चर्चा चालू असते आणि त्यानुसार शेअरबाजार हलत असतो. पण हीच बाजारात गुंतवणुकीची खरी संधी असते. सध्याच्या बाजारातही अशी संधी दिसत आहे. कारण भारताची आर्थिक स्थिती अस्थिर जागतिक वातावरणात बरीच स्थिर असल्याचे दिसत आहे.**



प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com

क्रिकेटमधील जाणकारांना मॅच सुरु असताना एक प्रश्न नेहमीच विचारला जातो, तो म्हणजे 'काय वाटतंय?' जरी मॅचचा निकाल स्पष्ट असेल तरीही हा प्रश्न निश्चितच कानावर पडतो. अटीतटीच्या सामन्याच्या बाबतीत तर, प्रश्न विचारणाराच सर्व खेळाडूंच्या क्षमतेचा विचार करून, त्यांच्या प्रतिभेनुसार, खेळातील सद्य परिस्थिती व वातावरण यांचा साधारणपणे विचार करून आपले मतदेखील मांडून मोकळा होताना आढळतो. अगदी याचीच री ओढत, शेअर बाजारातदेखील अशी उदाहरणे हमखास आढळतात. 'मार्केट' मधला माणूस भेटल्यावर त्याची ख्याली-खुशाली विचारल्यानंतर बोलले जाणारे विधान म्हणजे, 'सध्या बाजार जोरात आहे' किंवा 'सध्या मार्केट डाऊन आहे, नाही !..' आता हा प्रश्न मला विचारला गेल्यास एकंदरीतच बुचकळ्यात पडायला होते की समोरची व्यक्तीही, नवीन गुंतवणूक करण्यासाठी असा प्रश्न विचारत आहे की, गुंतवणूकदारांना खिजवण्यासाठी! कारण बाजार चांगला / जोरात आहे असे उत्तर दिल्यास समोरची व्यक्ती म्हणते, सगळीकडे मंदी असताना बाजार कसा काय वरती धरून टिकवून ठेवलाय कोणास ठाऊक ! आणि याउलट जर बाजारातील तेजी शाश्वत नाही असे उत्तर द्यावे तर भिती की, आपलेच दात व आपलीच जीभ.

गंमतीचा भाग सोडल्यास, अनेक वेळा बाजारातील घडामोडी, देशाच्या आर्थिक व्यवस्थेवर परिणाम करणारे घटक आणि कंपन्यांची परिस्थिती यावरून बाजाराचे गणित लावता येऊ शकते. तरीदेखील अनेकवेळा बाजारातील घडामोडी चक्रावून टाकणाऱ्या असतात. कारण बाजार हा नेहमीच संवेदनशील ठरत आलाय. आजच्या घडीलाही बाजारात संभ्रमाचे वातावरण आहे. भारतीय बाजारपेठेचे समृद्ध मूल्यांकन हे अर्थव्यवस्थेच्या नाजूक स्थितीशी विरोधाभासात्मक आहे. बाजार गेल्या तीन महिन्यात बराच खाली येवूनही वाढ दर्शवणारे शेअर्स आणि मोलाच्या कंपन्यांचे शेअर्स यांच्या किंमत-मूल्यात मोठी तफावत आहे. शेअरबाजार आणि त्यातील दर्जेदार भाग, हा अर्थव्यवस्था आणि उत्पन्न यामधील वाजवी पुर्नप्राप्ती मोठ्या प्रमाणात गृहीत धरत आहे. तथापि, अर्थव्यवस्थेला सामोऱ्या येणाऱ्या रचनात्मक अडचणी लक्षात घेता, त्वरित पुर्नप्राप्तीची शक्यता नजीकच्या भविष्यात धूसर दिसते. आजमितीस तरी, इंधनाचे चढे दर, रशिया-युक्रेनचे लांबलेले युद्ध आणि जगातील अस्थिर आर्थिक स्थिती, यामुळे अर्थव्यवस्था खालच्या पातळीवर असल्याचे चित्र दिसतेय तर बाजार त्या मानाने वरच्या पातळीवर असल्याचे दिसून येत आहे. मात्र, उपभोग अथवा



वस्तू वापराच्या क्रियेस बळ देण्यासाठी किंवा गुंतवणुकीच्या मागणीसाठी देशाच्या वित्तीय आघाडीवर करावी लागणारी कसरत, वाढतच चाललेल्या महागाईमुळे व्याजदर कपातीची वाढत चाललेली शक्यता, उच्च पातळीवरील सरकारी कर्ज, अशा अनेक संरचनात्मक मुद्द्यांमुळे आर्थिक पुर्नप्राप्ती नजीकच्या काळात आव्हानात्मक वाटत आहे.

सध्यातरी, भारतीय अर्थव्यवस्था-भारतीय भांडवली बाजार यांदरम्यानच्या व वृद्धी-मूल्य यांच्या समभागातील मूल्यांकन यांच्यामध्ये दिसणाऱ्या या विभिन्न द्वंद्वभावाबरोबर काही काळ आपल्याला काढावा लागेल असेच दिसतेय. एखाद्या कंपनीबाबत किंवा संपूर्ण अर्थव्यवस्थेबाबत बाजाराचे आडाखे नेहमीच दोन पावले पुढे असतात, गरज आहे ती आपण त्यातून शिकण्याची व आपला फायदा करून घ्यायची (नुकसानी मध्येदेखील). कारण बाजाराने भल्याभल्यांना पाणी पाजलेले ऐकलेय, पाहिलेय, त्यामुळे बाजारास सुप्रीम म्हणत त्याप्रमाणे आपल्या गुंतवणूक पद्धतीत बदल केल्यास नक्कीच अशा गोष्टी जमेच्या ठरू शकतात..

बाजार आणि अर्थव्यवस्था अशी असताना ज्या कंपन्यांचे खरेमूल्य अधिक आहे, पण बाजारातील त्यांच्या शेअरची किंमत कमी आहे, अशा कंपन्यांचा शोध घेतला पाहिजे. ज्या कंपन्यांचे मूल्य कमी आहे, पण बाजारातील मागणीमुळे ते वर गेले आहे, अशा कंपन्यांमध्ये अस्थिर आर्थिक परिस्थितीत मोठी वधघट पाहायला मिळते. पण ज्यांचे खरे मूल्य बाजाराने अजून ओळखलेले नाही, अशा कंपन्या तुलनेने स्थिर राहतात. बाजार खालच्या पातळीवर असताना ज्यांना दीर्घकालीन गुंतवणूक करावयची आहे, त्यांच्यासाठी अशा कंपन्या चांगल्या मानल्या जातात. ज्यांच्याकडे शेअर बाजारात थोडा अधिक काळ गुंतवणूक करण्यासाठीचा पैसा म्हणजे भांडवल आहे, त्यांनी या कंपन्यांमध्ये गुंतवणूक केली पाहिजे. अर्थात, निफ्टी १५००० पर्यंत खाली गेला होता, तेव्हा ती संधी अधिक होती. आता बाजार त्याच्याची १००० अंशाने वर आला आहे. त्यामुळे अशाही शेअरमधील जोखीम थोडी वाढली आहे, याचे भान अशा गुंतवणूकदारांनी ठेवले पाहिजे. अशा गुंतवणुकदारांसाठी सोबत काही कंपन्यांची नावे सुचविली आहेत. ज्यांना जोखीम घेणे आवडते, त्यांनीच ही गुंतवणूक करावी, हे ओघाने आलेच आणि जोखीमीशिवाय शेअर बाजार नाही, हे नक्की.

**सध्याच्या बाजारात आकर्षक मूल्य असलेल्या प्रमुख कंपन्या**

| कंपनी | १५ जुलै भाव (रुपये) | पी ई रेशो | बाजारमूल्य (कोटी रु.) | शेरा |
|---|---|---|---|---|
| कोल इंडिया | १९३.४० | ६.८७ | १ लाख १९ हजार१८७ | विजेची मागणी वाढणार |
| हिंदुस्थान एरोनॉटिक्स | १७२६ | ११.३६ | ५७ हजार ७१८ | देशी विमानांचे उत्पादन |
| वेदांता | २२७.८५ | ४.५० | ८४ हजार ४९६ | महसुलात ४८ टक्के वाढ |
| इन्फोएज | ३,८०३ | ३.८४ | ४८ हजार ९८४ | महसुलात तीन वर्षातील सर्वाधिक वाढ (३१ टक्के) |
| टेक महिंद्र | ९७३.८० | १७ | ९४ हजार ६३७ | फाईव्ह जी तंत्रज्ञानाचा फायदा होण्याची शक्यता |
| बजाज ऑटो | ३९१३ | १८.३७ | एक लाख १३ हजार दोनशे एकोणचाळीस | वाहन विक्रीत तसेच निर्यातीत वाढ, धातू स्वस्त झाल्याचा फायदा मिळणार |
| टाटा स्टील | ८८३.८० | २.७९ | एक लाख ७ हजार ९५८ | वरच्या किंमतीपासून ३३ टक्के खाली, विक्रमी नफा |

## अर्थसाक्षर स्पर्धा : २७

**निकाल पुढीलप्रमाणे**

**प्रश्न क्र. १. क्रिप्टो करन्सी तयार करताना कोणत्या तंत्रज्ञानाचा वापर केला जातो?**
*अ.* ब्लॉकचेन

**प्रश्न क्र. २. भारतात टपाल कार्यालयांची एकूण संख्या किती आहे?**
*आ.* दीड लाख

**प्रश्न क्र. ३. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त म्हणजे २०२३ च्या स्वातंत्र्यदिनी कोणत्या ७५ रेल्वेगाड्या सुरु करण्याची घोषणा पंतप्रधानांनी केली आहे?**
*ई.* वंदे भारत

**अर्थसाक्षर स्पर्धा २६ची बरोबर उत्तरे :**
**आलेल्या सर्व उत्तरांपैकी एका स्पर्धकाची उत्तरे बरोबर आली असून त्या विजेत्या स्पर्धकाचे नाव वैभव मच्छीन्द्र वर्तक. या स्पर्धकाला 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येत आहेत. त्यांनी सदर व्हाऊचर्स दुपारी २ ते ६ या वेळेत दैनिक राम प्रहरच्या कार्यालयातून घेऊन जावे. त्यांचे अभिनंदन!**

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २८

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. पुढीलपैकी कोणती कंपनी आर्टीफिशीयल इंटलिजियन्स क्षेत्रात काम करणारी नाही?**
*अ.* टाटा एलक्सी *आ.* हॅपीइस्ट माइंड
*इ.* झेन्सर टेक्नोलॉजीस *ई.* बीएएसएफ इंडिया

**२. पुढील पैकी कोणत्या कंपनीचा सेन्सेक्स ३० कंपन्यांत समावेश होत नाही?**
*अ.* सनफार्मा *आ.* बजाज फायनान्स
*इ.* एनटीपीसी *ई.* बजाज ऑटो

**३. भारताला आपल्या गरजेच्या इतके टक्के इंधनाची आयात करावी लागते?**
*अ.* १०० टक्के *आ.* ८५ टक्के
*इ.* ६० टक्के *ई.* ५० टक्के

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

# विहूर पुलाची दुरवस्था

## दोन्ही बाजूच्या रस्त्यांवर खड्डे, अपघाताचे प्रमाण वाढले



**मुरूड : प्रतिनिधी**

एक हजार मिलिमीटरपेक्षा जास्त पाऊस पडताच सार्वजनिक बांधकाम खात्याअंतर्गत असणाऱ्या मुरूड तालुक्यातील रस्त्यांची पुरती दैना झाली आहे. मागील पावसाळ्यानंतर दुरुस्ती न केल्यामुळे या रस्त्यांवर आता मोठमोठे खड्डे दिसू लागले आहेत. काही ठिकाणी या खड्ड्यांचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

मुरूड तालुक्यातील विहूर येथील छोट्या पुलावरून प्रवास करणे धोकादायक झाले आहे. पावसामुळे या पुलावर एका बाजूला मोठमोठे खड्डे तयार झाले आहेत. तर दूसऱ्या बाजूला संरक्षक भिंत बांधलेली नाही. त्यामुळे या पुलावरून एकेरी वाहतूक सुरू आहे. एखादे मोठे वाहन आल्यावर दूसऱ्या वाहन चालकांची मोठी पंचाईत होते. दुचाकी वाहनांचे छोटे-मोठे अपघात होत आहेत.

विहूर पुलाच्या संरक्षक भिंतीसाठी निधी मंजूर होऊनसुद्धा या कामाला सुरुवात झाली नाही. तर पुलावर पडलेले खड्डे पावसाळ्यापूर्वी भरण्याचा विसर सार्वजनिक बांधकाम खात्यास पडल्याने ऐन पावसाळ्यात या खड्ड्यांचे तलाव झालेला पहावयास मिळत आहे.

या पुलाला जोडणारे दोन्ही बाजूचे रस्तेसुद्धा खड्डेमय झाले आहेत. या खड्ड्यांमुळे विहूर पुल परिसरात मोठा अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याने विहूर पुल व परिसरातील खड्डे तात्काळ बुजवावेत, अशी ग्रामस्थांकडून मागणी होत आहे.

**विहूर पुलाच्या संरक्षक भिंतीचे काम मंजूर झाले असून लवकरच या कामास सुरुवात करण्यात येईल. त्याच वेळी पुलावरील व परिसरातील खड्डेसुद्धा बुजवण्यात येतील.**

**-एस.बी.गोरे, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग मुरूड**

# 'बाटू'च्या ग्रंथालय इमारतीला गळती

**पोलादपूर : प्रतिनिधी**

लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापिठ (बाटू) परिसरातील लायब्ररीच्या इमारतीला पावसाळ्यात गळती लागली असून, ती रोखण्यासाठी तंत्र व शास्त्र विकसित करण्याची गरज निर्माण झाली आहे.



लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ परिसरातील कॉलेज ऑफ पेट्रोकेमिकल इन्स्टिट्यूटच्या इमारतीला लागलेली गळती थांबविण्यासाठी छप्पर बसविण्याचे काम पावसाळ्यापूर्वी पुर्ण झाले नाही. या विद्यापिठाची भव्य इमारतदेखील गेल्या पावसाळ्यात गळत असल्याचे निदर्शनास आले होते. यंदा या विद्यापिठातील लायब्ररीच्या इमारतीला मोठ्या प्रमाणात गळती लागल्याने चक्क ताडपत्री आणि बादल्यांचा वापर करून गळक्या स्लॅबच्या छप्परातील पाणी वेचण्याचे काम दररोज सुरू झाले आहे.

या स्लॅब गळतीकडे विद्यापिठ प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी लायब्ररीतील कर्मचाऱ्यांनी त्यांच्या दालनात ठिकठिकाणी लावलेल्या ताडपत्री तसेच प्लॅस्टीक शीटस् आणि जागोजागी लावलेल्या बादल्यांची दृश्ये छायाचित्रीत करून व्हॉट्सअॅप ग्रुपवर व्हायरल केली आहेत.

लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ परिसरामध्ये अनेक इमारती आहेत. त्यांना पावसाळ्यात लागत असलेली गळती रोखण्यासाठी तंत्र व शास्त्र विकसित करण्याची गरज निर्माण झाली आहे, असे प्रशासनाकडून गंमतीने बोलले जात आहे.

# नेरळच्या महिला विकास केंद्राचे वादळी वाऱ्याने नुकसान

**कर्जत : बातमीदार**

नेरळच्या कोतवालवाडी ट्रस्टच्या इमारतींचे वादळी वाऱ्याने मोठ्या प्रमाणात नुकसान केले. तेथील महिलांचे क्लासेस बंद पडले आहेत.

कोतवालवाडी ट्रस्टमध्ये स्वातंत्र्यसैनिक हरिभाऊ भडसावळे महिला विकास केंद्र चालविले जाते. या केंद्रामध्ये समाजातील गरजू मुली व महिलांना शिवणकला व नर्सिंग प्रशिक्षण दिले जाते. या केंद्राच्या इमारतीवरील पत्रे वादळाने उडून गेले. तर तेथील सुरक्षारक्षकाचे घरदेखील कोसळले आहे. त्याबाबत महसूल विभागाला कळविण्यात आल्यानंतर मंडळ अधिकारी आणि तलाठी यांनी नुकसानीचे पंचनामे केले आहेत.



# कर्जत दहिवली येथील भाजीमार्केटमध्ये चिखलाचे साम्राज्य

**कर्जत : बातमीदार**

भाजीपाला उत्पादक शेतकरी आणि व्यवसायिक यांना एका जागी व्यवसाय करता यावा, यासाठी कर्जत कृषी उत्पन्न बाजार समितीच्या दहिवली येथील मैदानात आठवडा बाजार सुरु करण्यात आहे. मात्र सध्या सुरू असलल्या पावसात तेथे सर्वत्र चिखल झाला आहे.

कर्जत दहिवली येथील मार्केट यार्डच्या मैदानावर दर शनिवारी भाजी विक्रीचा बाजार भरतो. तालुक्यातील शेतकरी तेथे ताजा भाजीपाला विक्रीसाठी घेऊन येतात. ग्राहकांनादेखील ताजा गावठी भाजीपाला मिळतो. मात्र भाजीपाला विक्रीसाठी शेतकरी ज्या ठिकाणी बसतात तेथेच सायंकाळी शिल्लक माल टाकून दिला जातो. तो कुजून दुर्गंधी निर्माण झाली आहे.



पावसामुळे या परिसरात चिखल झाला असून, ग्राहकांना या चिखलातून वाट काढावी लागते. त्याबद्दल स्थानिक सामाजिक कार्यकर्त्या कल्पना दास्ताने यांनी कर्जत कृषी उत्पन्न बाजार समितीला पत्र देऊन कचरा काढण्याची मागणी केली आहे. तर भाजी विक्रेत्यांनी सर्व शिल्लक माल हा एकाच ठिकाणी साठवून ठेवावा, अशी सूचना केली आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती भाजी विक्रेत्यांकडून कर संकलन करीत असेल तर त्यांनी येथील कचरा उचलून नेण्याची कार्यवाही करायला हवी, असे मतदेखील दास्ताने यांनी व्यक्त केले आहे.

**दहिवली येथील मार्केट यार्डच्या मैदानावर चिखल झाला असून परिसरात दुर्गंधी भरून राहिली आहे. त्याच ठिकाणी भाजीपाला विकला जातो. हा जनतेच्या आरोग्याशी खेळ आहे. भाजी विक्रेतेसुद्धा या दुर्गंधीत, चिखलात नाईलाजाने व्यवसाय करतात.**

**-कल्पना दास्ताने, सामाजिक कार्यकर्त्या, दहिवली - कर्जत.**



# अखेर कर्जत शहराचा पाणीपुरवठा तिसऱ्या दिवशी सुरळीत

**कर्जत : बातमीदार**

मुसळधार पावसामुळे कर्जत शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या वंजारवाडी येथील पम्पिंग स्टेशन परिसरात वीजपुरवठा खंडित झाला होता. त्यामुळे कर्जत शहराच्या काही भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होत होता तर काही भागातील पाणीपुरवठा झाला नव्हता. शेवटी महावितरणकडून वंजारवाडी येथील कामे पूर्ण झाल्यानंतर शनिवारी (दि. १६) चौथ्या दिवशी कर्जतकरांना नळाचे पाणी मिळाले.



कर्जत तालुक्यातील वंजारवाडी येथे पेज नदीवर उभारलेल्या पाणी योजनेद्वारे शहराला पाणीपुरवठा होतो. वंजारवाडी येथील पंप हाऊस ते कर्जत शहर हे अंतर १२ किलोमीटरचे आहे. मुसळधार पावसात महावितरणचे खांब कोसळल्यामुळे वंजारवाडी परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला होता. त्याचा परिणाम कर्जत शहराच्या पाणीपुरवठ्यावर झाला होता. कर्जत शहराच्या काही भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होत होता तर काही भागातील पाणीपुरवठा बंद झाला होता. नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांनी महावितरणकडे मागणी करून वंजारवाडीसाठी अतिरिक्त फिडरमधून वीजपुरवठा तात्पुरत्या स्वरूपात सुरु झाल्यानंतर चौथ्या दिवशी शनिवारी कर्जत शहरात पाणी आले.

# माणगावमध्ये कायदेविषयक मार्गदर्शन

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुका विधी सेवा समिती आणि वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने माणगाव येथील एस. एस. निकम स्कुल अँड ज्युनिअर सायन्स कॉलेज येथे शनिवार (दि.१६) कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजीत करण्यात आले होते. शिबिरामध्ये दहावी व बारावीचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

जिल्हा न्यायाधीश भालेराव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या शिबिरात दिवाणी न्यायाधीश फुलझळके यांनी राईट्स टू एज्युकेशनची पार्श्वभूमी व वैशिष्ट्ये तसेच दिवाणी न्यायाधीश सटोटे यांनी राईट्स ऑफ चिल्ड्रन व त्यासाठी केलेल्या योजना, अॅड. सदफ येलुकर यांनी पोक्सो कायदा २०१२ याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

शिबिराचे प्रास्ताविक अॅड. राहुल ओक यांनी केले. माणगाव एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. एम. एस. निकम, प्राचार्या संगीता कोकाटे व विजय पाईकराव, तालुका वकील संघाचे अध्यक्ष अॅड. महेंद्र मानकर, सदस्य अॅड. विनोद घायाळ, अॅड. प्रकाश ओक, अॅड. राहुल ओक, अॅड. चंद्रशेखर माणके, अॅड. परेश जाधव आदी उपस्थित होते. विभावरी जाधव यांनी आभार मानले.



# बागमांडला शाळेच्या मैदानात भरतीचे पाणी



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

तालुक्यातील बागमांडला येथील रायगड जिल्हा परिषद शाळेच्या मैदानात शुक्रवारी (दि. १५) दुपारी समुद्राच्या भरतीचे पाणी आले. त्यामुळे विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांची तारांबळ उडाली. रस्त्यावरसुध्दा भरतीचे पाणी आल्यामुळे नागरिकांना अडचणीना सामोरे जावे लागले.

समुद्राच्या भरतीच्या पाण्यामुळे या शाळेतील विद्यार्थी व नागरिकांना होणाऱ्या त्रासाबद्दल माहिती देऊनही व शाळेच्या मैदानाला संरक्षक भिंत बांधण्याचा प्रस्ताव सादर करूनदेखील त्याची दखल घेतली जात नाही. ही समस्या लवकरात लवकर सोडविण्यात यावी, अशी मागणी श्रीवर्धन तालुका शिक्षण समन्वय समितीचे माजी अध्यक्ष) अजित शंकर भाटकर यांनी केली आहे.

# वळके हायस्कूलमध्ये वक्तृत्व स्पर्धा

## जेएसडब्ल्यू कंपनीचा उपक्रम; सानवी मांडलेकर प्रथम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या कार्यक्रमांर्तगत साळाव येथील जेएसडब्ल्यू कंपनीने वळके हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत सानवी मांडलेकर (इयत्ता आठवी) हिने प्रथम, वेदिका खोत (इयत्ता आठवी) हिने द्वितीय आणि विकी भोईर (इयत्ता नववी) याने तृतीय क्रमांक पटकावला.

या वक्तृत्व स्पर्धेकरिता विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर भारत हा विषय देण्यात आला होता. या स्पर्धेत वळके हायस्कुलच्या तीस विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. कंपनीचे सीएसआर विभाग प्रमुख राम मोहिते, राकेश चवरकर, इलेक्ट्रीक विभाग प्रमुख रमण धुमाळ, वळके हायस्कूलचे मुख्याध्यापक आर. डी. नाईक, शिक्षक बालाजी लाटे, सुरेश मोरे, पुनम लाटे, मॅजिक बस इंडिया फाउंडेशनच्या पूजा ठाकूर, वर्षा ठाकूर, शीतल गायकर यांच्यासह विद्यार्थी व पालक उपस्थित होते.



# महाडच्या सावंत विद्यालयात वह्यावाटप

**महाड : प्रतिनिधी**

रायगड शिक्षण प्रसारक मंडळाच्या महाड येथील आण्णासाहेब सावंत माध्यमिक विद्यालयात मुंबईतील समर्पण सामाजिक संस्थेकडून शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

रायगड शिक्षण प्रसारक मंडळाचे विश्वस्त संजय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला समर्पण संस्थेचे संस्थापकीय अध्यक्ष प्रशांत पवार, उपाध्यक्ष रमेश कदम, खजिनदार हरेश कदम, सल्लागार आनंद मगर व हरेश मोरे तसेच महिला सदस्या मनीषा पवार, साक्षी मगर, अनंत कदम, उन्मेष कदम, कोंझरचे माजी सरपंच निलेश देवगिरकर, माजी अध्यक्ष शशिकांत भद्रीके, खंडोजी पवार उपस्थित होते. मुख्याध्यापिका सुवर्णा निकम यांनी शैक्षणिक साहित्याची मदत दिल्याबद्दल समर्पण संस्थेचे आभार मानले.



# पेणच्या नेने महाविद्यालयातील शिबिरात ३२ जणांचे रक्तदान

**पेण : प्रतिनिधी**

जागतिक लोकसंख्या दिन निमित्तान भाऊसाहेब नेने महाविद्यालयात डीएलएलई व एनएसएस युनिट यांच्या विद्यमाने नुकतेच रक्तदान शिबिर घेण्यात आले. या शिबिरात ३२जणांनी रक्तदान केले.

पेण एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष अॅड. बापूसाहेब नेने व माजी कार्याध्यक्ष बापुराव आठवले यांच्या उपस्थितीत या रक्तदान शिबिराचे उद्‌घाटन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनचे कार्यक्रम अधिकारी डॉ. टी. डी. माळवे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी प्रास्ताविकात रक्तदानाचे महत्त्व सांगून विद्यार्थी व विद्यार्थीनींना रक्तदान करण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन प्रा. गिरीश उपाध्ये यांनी केले. डीएलएलईचे प्रमुख डॉ. देविदास बामणे यांनी आभार मानले.

जिल्हा रुग्णालय शासकीय रक्तपेढी आणि पेण ग्रामीण रुग्णालय यांच्या सहकार्याने घेतलेले हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. गीता मेनन, डॉ. एस. डी. लकडे, प्रा. स्नेहल म्हात्रे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



# मोरबे धरणात अद्यापही कमी पाणीसाठा

## पूर्ण भरण्यासाठी २३०० मिमी पावसाची आवश्यकता

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

जून महिना कोरडा गेल्याने नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणाची पाणी पातळी खालावली होती, मात्र मागील पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे धरण पातळी चांगलीच वाढली आहे. धरणात आतापर्यंत ६० टक्के पाणीसाठा झाला आहे. तर धरण शंभर टक्के भरण्यासाठी आणखी २३०० मिमी पावसाची आवश्यकता आहे.

मोसमी पावसाचे आगमन झाल्यानंतर पूर्ण जून महिना पावसाने दडी मारली होती. त्यामुळे राज्यात पाणी संकट निर्माण झाले होते. नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणात ऑगस्टअखेरपर्यंत पुरेल इतकाच पाणीसाठा शिल्लक राहिला होता. त्यामुळे महापालिका प्रशासनाने नवी मुंबईत पाणी कपातीचा प्रस्ताव तयार करीत विभागानुसार सायंकाळी एक तास पाणी कपात करण्याचे नियोजन केले होते. मात्र १ जुलैपासून शहरात व मोरबे धरण परिसरात पावसाचे आगमन झाले.



यानंतरही शहरात चांगला पाऊस होत होता, मात्र मोरबे धरण परिसरात तुरळक पाऊस होता. मात्र मागील आठ दिवसांत पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस सुरू आहे. आतापर्यंत १७०७.२० मिमी. पावसाची नोंद झाली आहे. तर गेल्या वर्षी याच काळात १२५८.५ मिमी पाऊस झाला होता. फक्त आठ दिवसांतच गेल्या वर्षीच्या पावसाची सरासरी ओलांडत सुमारे ५० मिमी. अधिक झाला आहे. त्यामुळे धरण पातळीत झपाट्याने वाढ होत धरण ६० टक्के भरले आहे. पुढील १९२ दिवस म्हणजेच २२ जानेवारी २०२३ पर्यंत शहराला पाणीपुरवठा करता येणार आहे. धरण शंभर टक्के भरण्यासाठी २३०० मिमी पावसाची आवश्यकता आहे. धरण भरण्यासाठी ४००० मिमी पावसाची आवश्यकता असते. गेल्या वर्षी २९ सप्टेंबर २०२१ रोजी धरण भरून वाहू लागले होते.

> **पाऊस सुरू होण्यापूर्वी धरणात गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी पाणीसाठा होता; परंतु मागील आठवडाभरात पाणीसाठी ३० टक्केवरून ६० टक्के पार झाला आहे. त्यामुळे असाच पावसाचा जोर राहिला तर मोरबे यंदाही १०० टक्के भरेल.**
> **-अभिजित बांगर, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

# गोवठणे अंगणवाडीत विविध उपक्रम

## आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य

**उरण : वार्ताहर**

सद्यस्थितीत वाढदिवस आणि त्याचे आयोजन हे मोठे कार्यक्रम, पुष्पगुच्छ, पार्टी यांच्या माध्यमातून होत असते, परंतु या सर्व गोष्टींचा बगल देवून आपण ज्या समाजात राहतो ते समाजऋण हे आपल्यावर असते आणि या जाणीवेपोटी उरण भाजप महिला तालुकाध्यक्ष राणी सुरज म्हात्रे यांनी गोवठणे गावातील अंगणवाडी विद्यार्थ्यांना गणवेश वाटप, खाऊ वाटप व अंगणवाडी सेविकांना साडी वाटप करण्यात आले. आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला.



राष्ट्रहित प्रथम ही भारतीय जनता पक्षाची व कार्यकर्त्यांची भावना आहे. हिच भावना जोपासत राणी सुरज म्हात्रे ह्या कायम सामाजिक उपक्रमांत अग्रेसर असतात. त्यांनी या आधीदेखील अंगणवाडी सेविकांना साडीवाटप केले होते. त्यांच्याशी हितगूज साधताना त्यांना विद्यार्थी गणवेशाची गरज लक्षात आली. आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसानिमित्त गणवेश वाटप करून अनोख्या शुभेच्छा दिल्या.

या वेळी अंगणवाडी सेविका, मदतनीस, कार्याध्यक्ष-गोवठणे भाजपा सुरज म्हात्रे, शाखाध्यक्ष रोशन म्हात्रे, संदेश म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य संतोष दशरथ वर्तक, प्रेम पाटील, विद्यानंद म्हात्रे यासंह भाजप शाखा गोवठणेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# सीकेटी विद्यालयात वक्तृत्व स्पर्धेस प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुपौर्णिमेनिमित्त जीवनातील गुरूंचे महत्त्व या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन शनिवारी (दि. १६) करण्यात आले होते.

उच्च माध्यमिक विद्यालयाचे पर्यवेक्षक अनुराधा कोल्हे (विज्ञान विभाग), अजित सोनवणे (कला विभाग), प्रशांत मोरे (वाणिज्य विभाग) यांच्या मार्गदर्शनाने व उपस्थितीने या स्पर्धेची औपचारिक सुरुवात करण्यात आली. तीनही विभागांच्या पर्यवेक्षकांनी स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.




या स्पर्धेमध्ये उच्च माध्यमिक विद्यालयातील ३१ स्पर्धकांनी सहभाग घेतला. स्पर्धेसाठी मराठी हिंदी व इंग्रजी या तीनही माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपली वक्तृत्व कला सादर केली. या स्पर्धेचे मूल्यांकन करण्यासाठी उच्च माध्यमिक विद्यालयातील साईनाथ पाटील, राजेंद्र गांगरे, मिलिंद सुरवाडे यांनी परीक्षक म्हणून आपली भूमिका पार पाडली. तसेच या स्पर्धेसाठी अनेक शिक्षक ही उपस्थित होते. सांस्कृतिक विभागातर्फे अतिशय सुंदररित्या या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

**असा आहे स्पर्धेचा निकाल**

***मराठी माध्यम १) प्रथम दक्षता म्हात्रे (बारावी), द्रितीय ध्वनी सावंत (बारावी), हिंदी माध्यम प्रथम उर्वशी ठाकूर (बारावी), द्रितीय शिवानी फडणीस (बारावी), इंग्रजी माध्यम प्रथम स्तुती पवार (बारावी), द्रितीय मधुरा लांजेकर (बारावी).***

# कुष्ठरुग्ण बांधवांकडून अ‍ॅड. भुजबळ यांचे आभार

**पनवेल : प्रतिनिधी**

माजी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ यांच्या सततच्या सहकार्यामुळे व प्रयत्नांमुळे पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील कुष्ठरुग्ण बांधवांना मिळणारी २५०० रुपयांच्या मासिक आर्थिक मदतीत भरीव वाढ झाली आहे. आता सर्व कुष्ठरुग्णांना ४००० रुपये मासिक आर्थिक मदत मिळणार आहे. त्यामुळे कुष्ठरुग्ण बांधवांनी अ‍ॅड. भुजबळ यांचे जाहीर आभार मानले.

अ‍ॅड. भुजबळ यांनी वेळोवेळी धीर देऊन कुष्ठ रुग्णांसाठी मासिक आर्थिक मदत आणि वसाहतीमधील कुष्ठ रुग्णांना औषधोपचाराच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या. कुष्ठरुग्णांना मिळणाऱ्या मासिक आर्थिक मदतीत भरीव वाढ करून दिली. त्याबद्दल हिंद कुष्ठ निवारण संघ महाराष्ट्र व श्री गणेश कुष्ठरोग वसाहत सेवा संस्था पनवेल यांस कडून अ‍ॅड. भुजबळ यांचे लेखी पत्र देऊन आभार मानले.



या वेळी शांतिवन कोषाध्यक्ष उदय ठकार, महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटना महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटना अशोक आंबेकर, ज्ञानेश्वर खोलगडे, रामदास भोईर, कविश्वर सदावर्ते, साजिदा साबीर, सिताराम म्हात्रे आदी उपस्थित होते.

# जेएनपीएच्या कामगार विश्वस्तपदांसाठीची निवडणूक लांबणीवर

**उरण : प्रतिनिधी**

जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रजवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट ऐवजी अ‍ॅथोरिटी अ‍ॅक्ट स्थापनेनंतर २ ऑगस्ट २०२२ रोजी जाहीर झालेली पहिलीच निवडणूक काही तांत्रिक अडचणींमुळे अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आली आहे.

जेएनपीएच्या कामगार संघटनांच्या प्रतिनिधींची १२ जुलै रोजी मुंबईत बैठक बोलाविण्यात आली होती. या बैठकीनंतर दोन कामगार नियुक्त विश्वस्त पदांसाठी २ ऑगस्ट २०२२ रोजी निवडणूक घेण्याची अधिकृतपणे घोषणा केंद्रीय डेप्युटी चीफ लेबर कमिशनर तेज बहादुर यांनी केली होती, मात्र त्यानंतर तेज बहादुर यांनीच पुन्हा काही तांत्रिक अडचणींमुळे दोन कामगार नियुक्त ट्रस्टी पदासाठी निवडणूक स्थगित करण्यात येत असल्याचे पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

केंद्र सरकारच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नियुक्तीआधीच कामगार विश्वस्तांची निवडणूक जाहीर करण्यात आली होती. त्यामुळे तेज बहादुर यांनी जाहीर केलेला निवडणूक कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला असल्याचे कामगार संघटनांच्या प्रतिनिधींकडून सांगितले जात आहे.

# दिघोडे येथील महात्मा गांधी विद्यालयात गुरूपौर्णिमा आणि काव्य संमेलन



**उरण : रामप्रहर वृत्त**

दिघोडे येथील महात्मा गांधी विद्यालयात बुधवारी (दि. १३) ज्येष्ठ कवी प्रा. एल. बी. पाटील, लोकशाहीर मोरेश्वर म्हात्रे, विज्ञान कवी भ. पो. म्हात्रे यांच्या उपस्थितीत गुरूपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या वेळी काव्य संमेलनाच्या माध्यमातून उपस्थित कवींनी आपल्या कविता सादर करून विद्यार्थ्यांना कवितेतून समाजाविषयी तसेच निसर्गाविषयी जाण आणि भान ठेवण्यास प्रोत्साहित केले. काव्य संमेलनाचे अतिशय सुंदर आणि मनाला भावणारे निवेदन कवयित्री आणि विद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाच्या सदस्य रंजना केणी यांनी केले. या वेळी विद्यालयातील १५ ते २० मुलांनी आपले मनोगत व्यक्त केले.

विद्यालयाच्या सहाय्यक शिक्षिका सौ. थळी आणि सौ. बडगुजर यांनी काव्यवाचनात सहभाग घेतला, तर ज्येष्ठ शिक्षक श्री. पिंपरे यांनी कवी आणि कविता यांचे ऋणानुबंध कसे असतात ते पटवून दिले. श्री. फल्ले यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. नाईक यांच्या अनुमतीने कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात पोस्टर मेकिंग स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि. १६) अकांऊन्ट अ‍ॅण्ड फायनान्स विभागाच्या वतीने पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सहभाग घेऊन आपल्या विशिष्ट कला व सर्जनशिलतेचे प्रदर्शन करून विविध प्रकारची पोस्टर्स तयार केली.



या स्पर्धेत परीक्षक म्हणून प्रा. स्मिता राऊत यांनी काम पाहिले. स्पर्धेचे आयोजन अकांऊन्ट अ‍ॅण्ड फायनान्स विभागाचे प्रमुख प्रा. प्रवर शर्मा यांनी केले होते, तर मौसमी वसिम व सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी स्पर्धा यशस्वी केली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी या स्पर्धेस उपस्थित राहून विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना प्रोत्साहन दिले. त्याचबरोबर अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षच्या समन्वयक प्रा. महेश्वरी झिरपे उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, व्हॉइस चेअरमन वाय. टी. देशमुख व सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# पैशाने भरलेले पाकिट केले परत

**खारघर : प्रतिनिधी**

तळोजामधील खुटारी गावातील संजय भोईर यास रस्त्यावर सापडलेले पैशाचे पाकिट आणि एटीएम कार्ड, संबंधित व्यक्तीच्या घरी पोहच केल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. खारघर सेक्टर १० मधील फैजल फर्मान काझी हे ७ जुलैला बकरी ईदसाठी बकरी खरेदीसाठी खुटारी परिसरात गेले होते. या वेळी त्यांचे पाच हजारांहून अधिक रोकड आणि बँकेचे दोन एटीएम कार्ड असलेले पॉकेट गहाळ झाले.

खुटारी गावातील संजय भोईर हे रस्त्यावर जाताना त्यास पॉकेट दिसून आले. त्यांनी पॉकेट सोशल मीडियावर व्हायरल केले. या वेळी संजय यांनी पेठतील संदीप वास्कर व मुर्बीतील मनेश पाटील यांची भेट घेतली. आणि दोघांनी एटीएम असलेले बँक गाठून बँक मॅनेजरला माहिती दिली.

बँक मॅनेजर यांनी या दोघांची संपूर्ण माहिती घेऊन त्या व्यक्तीचा पत्ता दिला. तेव्हा या दोघांनी फैजल फर्मान काझी यांचा घराचा शोधून त्यांच्या पत्नीकडे पैशाचे पॉकेट आणि एटीएम कार्ड सुपूर्द केले.



**पनवेल : गरीब रुग्णांचे देवदूत म्हणून ओळखले जाणारे सुप्रसिद्ध डॉ. गिरीश गुणे यांना वाढदिवसानिमित्त माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी शुभेच्छा दिल्या.**

# उरण महाविद्यालयात गुरूपौर्णिमा साजरी

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ वाणिज्य व कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने गुरूपौर्णिमा साजरी करण्यात आली.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. बळीराम एन. गायकवाड यांच्या मागठदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात अकाउन्टंसी विभागप्रमुख प्रा. के. ए. शामा यांनी आई-वडील हे आपले पहिले गुरू असतात असे सांगून जीवनात आपल्याला योग्य मार्ग दाखवून आपले जीवन घडविण्यात ज्या गुरूची भूमिका महत्त्वाची आहे त्यांचे स्मरण करण्याचा हा दिवस आहे. त्यामुळे त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे, असे प्रतिपादन केले. आक्युएसी समन्वयक प्रा. डॉ. ए. आर. चव्हाण यांनीही मार्गदर्शन केले. खुशी शेखने भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर्या घरत हिने केले.








# पाचाडच्या धर्मशाळेवर पैशाचा चुराडा

## जुन्या इमारतीवरच काम करून पैशाची उधळपट्टी; ग्रामस्थांचा आरोप



(छाया : महेश शिंदे)

**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या सार्वजनिक बाधकाम विभागाच्या धर्मशाळेचे काम रायगड प्राधिकरणच्या माध्यामतून केले जात आहे. जुन्या इमारतीवरच काम करून इमारतीचे काम केले जात असल्याने जनतेच्या पैशाची उधळपट्टी केली जात असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. याठिकाणी बांधण्यात येत असलेल्या सरंक्षक भिंतीचे कामदेखील निकृष्ट दर्जाचे केले आहे.

किल्ले रायगडच्या पायथ्याशी पाचाड येथे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून धर्मशाळा बांधण्यात आली आहे. या धर्मशाळेमुळे पर्यटक आणि शैक्षणिक सहलीच्या राहण्याची सुविधा होत होती. गेल्या काही वर्षापासून धर्मशाळेच्या दुरुस्तीकारिता निधी नसल्याचे कारण देत ही धर्मशाळा पडीक अवस्थेत ठेवण्यात आली होती. आता रायगड प्राधिकरण याठिकाणी विविध विकासात्मक कामे करत आहे. ९० लाख रुपये खर्च करून या धर्मशाळेचीदेखील दुरुस्ती केली जात आहे. मुळातच अनेक वर्षापूर्वीची ही इमारत सुस्थितीत असली तरी वाढत्या पर्यटकांच्या संख्येमुळे यामध्ये बदल होणे अपेक्षित आहे. किल्ले रायगड संवर्धनातील विविध कामांना सुरवात झाल्यानंतर धर्मशाळेचीदेखील दुरुस्ती सुरु करण्यात आली आहे. या इमारतीच्या परिसरात शौचालय आणि स्वच्छतागृह, सरंक्षक भिंत उभी केली आहे. अद्याप स्वच्छतागृहाचे काम अर्धवट अवस्थेत आहे तर मूळ इमारतीच्या छपराचे कामदेखील अपूर्ण आहे. इमारतीचा मूळ ढाचा तसाच ठेवून छपरावरील काम केले जात आहे. या इमारतीच्या सरंक्षक भिंतीचे काम निकृष्ट पद्धतीचे झाले असून दोन ठिकाणी हे काम ढासळले आहे. या कामात पुरेसा पाण्याचा वापर झाला नसल्याचा आरोपदेखील ग्रामस्थांनी केला आहे. मूळ इमारत तोडून पुन्हा नव्या इमारतीची उभारणी करणे आवश्यक होते मात्र तसे न करता जुन्या इमारतीवरच काम करून लाखो रुपयाचा चुराडा केला जात असल्याचे देखील ग्रामस्थांनी स्पष्ट केले.





किल्ले रायगडला प्रतिवर्षी लाखो शिवभक्त भेट देत असतात. संपूर्ण राज्यातून शैक्षणिक सहलीदेखील मोठ्या प्रमाणावर येत असतात. या शैक्षणिक सहलीमधील शेकडो विद्यार्थ्यांना खाजगी हॉटेलमध्ये राहणे न परवडणारे आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि शिवभक्तांना ही धर्मशाळा राहण्यासाठी सोयीची ठरते. शिवाय विविध छोटे कार्यक्रमदेखील यामध्ये केले जात होते.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील ही धर्मशाळा निधी आणि कर्मचाऱ्यांअभावी गेली अनेक वर्षे धूळ खात पडून राहिली. यामुळे याठिकाणी पाणी, स्वच्छता, आणि वीजेचा प्रश्न निर्माण झाला होता. देखभाल, दुरुस्ती होत नसल्याने पडून राहिलेल्या या धर्मशाळेची दुरुस्ती रायगड प्राधिकरणच्या माध्यमातून केली जात आहे. मात्र प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांनी या कामाकडे दुर्लक्ष केले आहे. प्रशासनदेखील रायगड प्राधिकरणाच्या कामात कोणतीच सूचना करत नसल्याचे दिसून येत आहे.

**धर्मशाळेवची मूळ इमारत तोडून, वाढत्या पर्यटकांचा विचार करून नव्या पद्धतीने इमारत बांधणे अपेक्षित होते. मात्र जुन्या इमारतीवरच काम करून रायगड प्राधिकरण पैसे वाया घालवत आहे. तसेच सरंक्षक भिंतदेखील निकृष्ट पद्धतीची झाली आहे.**

**–जयेश लामजे, ग्रामस्थ, पाचाड, ता. महाड**

**पाचाड येथील धर्मशाळेचे काम प्लाननुसार होत असून या धर्मशाळेच्या छपराचे काम लवकरच पूर्ण केले जाईल. धर्मशाळेची मूळ इमारत मजबूत असल्याने केवळ वरील काम केले जात आहे.**

**–स्वप्नील बुर्ले, शाखा अभियंता, रायगड प्राधिकरण**

# नागोठणे भाजप पदाधिकाऱ्यांनी घेतली आमदार रविशेठ पाटील यांची भेट

**नागोठणे : प्रतिनिधी**

गुरुपौर्णिमे निमित्त नागोठणे येथील भाजप पदाधिकाऱ्यांनी बुधवारी पेण येथे जाऊन आमदार रविशेठ पाटील यांचे आशीर्वाद त्यांचे घेतले. या वेळी त्यांनी हार, पुष्पगुच्छ व शाल देऊन आमदार पाटील आणि त्यांच्या पत्नी कौशल्या पाटील यांचा सन्मान केला.

भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मारुती देवरे, नागोठणे शहराध्यक्ष सचिन मोदी, उपाध्यक्ष गौतम जैन, रोहा तालुका महिला मोर्चा उपाध्यक्ष अर्पणा सुटे, मीना मोकल यांनी गुरुपौर्णिमे निमित्त आमदार रविशेठ पाटील यांची भेट घेतली. या वेळी सचिन मोदी यांनी आमदार पाटील यांना शुगर चेक करणारी मशीन व सेन्सर भेट दिला. तसेच आमदार पाटील यांचे पुत्र वैकुंठ पाटील यांना शाल व पुष्पगुच्छ दिला.




(छाया : राज वैशंपायन)

# वाहनतळामध्ये झाड कोसळले

**कर्जत : बातमीदार**

माथेरान दस्तुरीनाका येथील वाहनतळामध्ये उभ्या करण्यात आलेल्या एका महागड्या गाडीवर गुरुवारी (दि. १४) रात्री झाड कोसळले. त्यात गाडीचे मोठे नुकसान झाले आहे.

**माथेरान दस्तुरी नाका येथे गाडीचे नुकसान**



मुंबई येथील काही पर्यटक माथेरान येथे पर्यटनासाठी आले होते. आपली स्कोडा कंपनीची महागडी कार दस्तुरीनाका येथील वाहनतळामध्ये उभी करून ते माथेरान शहरात पर्यटनासाठी गेले होते. गुरुवारी रात्री त्या गाडीवर मोठे झाड कोसळले. मात्र गाडी मालकाला या घटनेची माहिती शुक्रवारी सकाळी मिळाली.

माथेरान येथील वाहनतळाची व्यवस्था वन विभागाच्या अखत्यारीत असून संयुक्त वन संरक्षण समितीच्या माध्यमातून कर संकलन केले जाते. त्यामुळे वादळात कोसळलेल्या झाडामुळे गाडीचे झालेलं नुकसान कोण भरून काढणार याबद्दल प्रश्न निर्माण झाला आहे.

# रेवदंडा येथे सरकारी कामात अडथळा; आरोपीला शिक्षा

## अलिबाग सत्र न्यायालयाचा निकाल

**अलिबाग : प्रतिनिधी**

सरकारी कामात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीला अलिबाग येथील सत्र न्यायालयाने सक्त मजूरीची शिक्षा सुनावली. महेंद्र एकनाथ मोहीमकर असे शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत २४ एप्रिल २०२१ रोजी ही घटना घडली होती. फिर्यादी पोलीस कर्मचारी आणि त्यांचे सहकारी हे कोव्हीड काळात पोलीस बंदोबस्तावर होते. या वेळी आरोपी महेंद्र मोहीमकर हे तोंडाला अर्धवट रुमाल लावलेल्या अवस्थेत मोटरसायकलवर चौल परिसरात फिरत असल्याचे फिर्यादी पोलिसांच्या निदर्शनास आले. याबाबत पोलिसांनी त्याच्याकडे विचारणा केली असता, तो महिला पोलीस कर्मचारी आरती पाटील यांच्या अंगावर धाऊन गेला. तसेच त्याने आरेरावी करत धमकवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्याच्या विरोधात भादवी कलम ३५३, २६९,२७०. १८८ सह आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ अन्वये रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तपास करून याबाबतचे दोषारोप पत्र न्यायालयात दाखल केले होते.

या प्रकरणाची सुनावणी अलिबाग येथील विशेष जिल्हा सत्र न्यायाधिश अशोक कुमार भिल्लारे यांच्या न्यायालयात झाली. सुनावणी दरम्यान सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. प्रमोद प्रभाकर हजारे यांनी काम पाहिले. सुनावणी दरम्यान एकूण पाच जणांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या. फिर्यादी आरती पाटील, साक्षीदार भारत नाईकडे, तपासिक अमंलदार एस. जी. देठे यांच्या साक्षी महत्त्वपुर्ण ठरल्या. दोन्ही बाजूचे युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपी महेंद्र मोहीमकर याला सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी दोषी ठरवले. सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ग्राह्य धरून आरोपीला सहा महिने सश्रम कारावास आणि दोन हजार रुपये दंडही ठोठावला. कोविड काळात संचारबंदीचे उल्लंघन करून पोलिसांच्या कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी शिक्षा होण्याची ही पहिलीच घटना असावी.

# खालापुरात पावसाचा जोर ओसरला

## लावणीच्या कामाला वेग

**खोपोली : प्रतिनिधी**

दहा दिवसापासून थैमान घातलेल्या पावसाने खालापूरात पर्जन्यमानाची पन्नास टक्के सरासरी पार केली आहे. आता पावसाचा जोर कमी झाल्याने लावणीच्या कामाला वेग आला आहे.

जून महिन्यात पावसाने ओढ दिल्यानंतर दुबार पेरणीचे संकट खालापूरातील बळीराजावर घोंगावत असताना जुलै महिन्याच्या सुरूवातीपासून वरुणराजा जोरदार बरसला. १० दिवसांत कोसळलेल्या पावसाने खालापूर तालुक्यात पूर परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र सध्या पावसाचा जोर ओसरल्याने तालुक्यात भात लावणीची कामे सुरू झाली आहेत.

रायगड जिल्ह्यात १५ जुलै २०२२पर्यंत २४६९१ मिलिमीटर पाऊस पडला आहे. जिल्ह्यात माथेरान खालोखाल खालापूर तालुक्यात सर्वाधिक पावसाची नोंद झाली आहे. आतापर्यंत माथेरानला सर्वाधिक २५७४मिलिमीटर पाऊस झाला असून खालापूर तालुक्यात १७९६मिलिमीटर पाऊस पडला आहे. भातशेती लागवडीसाठी आवश्यक पाऊस झाल्याने आणि थोडी उघड मिळाल्याने लावणीच्या कामासाठी खालापूर तालुक्यातील शेतकरी बाहेर पडले आहेत.

खालापूरात भातपिकाचे लागवड क्षेत्र सरासरी तीन हजार हेक्टर असून २७५० हेक्टर क्षेत्रावर भात पिकाची लागवड होते. तालुक्यात प्रामुख्याने रत्ना, जया, रुपाली, अवनी या वाणाची भात लागवड केली जाते. यामध्ये रत्ना आणि जया या वाणाला जास्त मागणी असते. खालापूर तालुक्यातील धरणांतील पाणीसाठ्यातसुध्दा वाढ झाली आहे.



(छाया : विनायक मांडपे)

# महावितरणच्या कर्मचाऱ्यांची कमाल



## धरणात पोहत जाऊन तुटलेल्या तारा जोडल्या


**कर्जत : बातमीदार**

वीजवाहिनी तुटल्यामुळे कर्जत तालुक्यातील पळसदरी परिसरामधील वीजपुरवठा तीन दिवस बंद होता. तो सुरळीत करण्यासाठी महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी रेल्वेच्या धरणातून पोहत जाऊन विजेच्या तारा खेचल्या व त्यांची जोडणी केली. तब्ब्ल २७ तास हा प्रयत्न सुरु होता. त्यानंतर पळसदरी भागातील वीज पुरवठा सुरळीत झाला.

कर्जत महावितरणच्या दहिवली सेक्शनमधील पळसदरी ग्रामपंचायत हद्दीतील पळसदरी गाव ते आदिवासीवाडी या दरम्यानच्या वीजवाहिन्या तुटल्यामुळे त्या परिसरातील वीजपुरवठा १२ जुलै रोजी खंडित झाला होता. पळसदरी गाव ते आदिवासीवाडी यांच्यामध्ये रेल्वेचे धरण आहे. हे धरण काठोकाठ भरले असल्याने नवीन वीज वाहिन्या कशा टाकायच्या? असा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र महावितरणचे सहाय्यक अभियंता गणेश देवके यांच्या मार्गदर्शनाखाली शाखा अभियंता वैभव डफल यांनी सहकाऱ्यांना सोबत घेऊन धरणाच्या पाण्यातून तारा वाहून नेण्याचे नियोजन केले. दशरथ मेहतर, गणेश मेहतर आणि रामदास भगत या तीन कर्मचाऱ्यांनी धरणाच्या पाण्यातून पोहत जात वीज वाहक तारा ओढून नेण्याचे काम केले. या कर्मचाऱ्यांच्या मेहनतीला २७ तासांनी यश आले. त्यानंतर पळसदरी परिसरातील वीजपुरवठा सुरळीत झाला.

# बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांच्या रांगा


## पालीत पावसाने उसंत घेतल्याने उत्साह



**पाली : प्रतिनिधी**

सलग सहा दिवसांच्या संततधारेनंतर पालीमध्ये शनिवारी (दि. १६) पावसाने विश्रांती घेतली. त्यामुळे संकष्टी चतुर्थीनिमित्त बल्लाळेश्वराचे दर्शन घेण्यासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या.

शनिवार, रविवार सुट्टी असल्याने पालीतील बल्लाळेश्वर मंदिर शनिवारी भाविक भक्तगणांनी फुलून निघाले. रायगड जिल्ह्यासह मुबंई, ठाणे, पुणे आदी शहरांतील भाविक व पर्यटक मोठ्या प्रमाणावर पालीत दाखल झाले होते. भाविकांच्या सोईसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती.



(छाया : धम्मशील सावंत)

### *वाहनांचीही गर्दी*

***बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पालीत दाखल झालेल्या भाविकांच्या गाड्यांमुळे वाहतुकीस अडसर निर्माण झाल्याचे दिसून आले, मात्र पोलीस व बल्लाळेश्वर देवस्थानचे सुरक्षा रक्षक वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न करीत होते. पोलीस निरीक्षक विश्वजित काईनगडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक नाक्यावर चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.***

# जिल्ह्यातील ५० तलावांच्या ठिकाणी होणार ध्वजारोहण

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून १३३ तलावांची अमृत सरोवर पोर्टलवर नोंद करण्यात आली आहे. रायगड जिल्हा परिषदेने राज्यात सर्वाधिक तलावांची नोंद केली आहे. ७७ तलावांच्या संवर्धनाचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यापैकी ५० तलावांच्या ठिकाणी स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी यांच्या हस्ते ध्वजारोहण कार्यक्रम करण्यात येणार आहे, अशी माहिती रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली.

हर घर झेंडा अभियानची माहिती देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत डॉ. किरण पाटील बोलत होते. भारतीय स्वातंत्र्याचे हे अमृत महोत्सवी वर्ष आहे. या अनुषंगाने केंद्र व राज्य सरकारच्या वतीने अनेक उपक्रम राबविण्यात येत आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून ११ ते १७ ऑगस्ट या कालावधीत जिल्ह्यात 'हर घर झेंडा' अभियान राबविण्यात येणार आहे. आपल्या घरवर राष्ट्रध्वज उभारून सर्व नागरिकांनी या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. किरण पाटील यांनी या वेळी केले.

शासकीय, निमशासकीय, खाजगी आस्थापना, सहकारी संस्था, शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या इमारतीवर तर नागरिकांनी स्वत:च्या घरावर स्वयंस्फुर्तीने राष्ट्रध्वजाची उभारणी करावी. स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस यंत्रणा, शाळा व महाविद्यालये, परिवहन, आरोग्य केंद्रे, स्वस्त धान्य दुकाने, सहकारी संस्था अशा सर्वसामान्य नागरिकांशी निगडीत यंत्रणांचा वापर करून नागरिकांनी राष्ट्रध्वज स्वयंस्फूर्तीने लावायचा आहे. ८ ऑगस्ट रोजी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यात 'हर घर झेंडा' अभियानाची माहिती देण्यात येणार आहे, असे डॉ. किरण पाटील यांनी सांगितले.

या अभियानांतर्गत जिल्ह्यातील महिला बचत गटांना रोजगार मिळवून देण्यासाठी रायगड जिल्हा परिषद प्रयत्नशील आहे. जे बचतगट शिवणकाम क्षेत्रात कार्यरत आहेत त्यांनी भारताचे झेंडे बनवावेत, हे झेंडे विक्रीसाठी ग्रामपंचायत हद्दीत विक्री स्टॉल व जिल्हा परिषद गटात बचतगट महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे, अशी माहिती त्यांनी या वेळी दिली.

# कर्जतच्या फार्मसी महाविद्यालयात वृक्षसंवर्धन सप्ताह

## तीन हजारांहून अधिक वृक्षांचे संगोपन

**कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**

कोंकण ज्ञानपीठ संस्थेचे संस्थापक स्व. आप्पासाहेब धारकर यांच्या जयंती निमित्त कर्जत येथील राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाच्या आवारात नुकताच वृक्षसंवर्धन सप्ताह सुरू करण्यात आला.

सुरूवातीला स्व. आप्पासाहेब धारकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. या वेळी महाविद्यालयीन विकास समिती सदस्य ज्ञानेश्वर जाधव, दीपक बोराडे, प्रा. प्रीतम जुवाटकर, डॉ. भरत टेकाडे आदी उपस्थित होते. त्यांनतर महाविद्यालयाच्या परिसरात प्राचार्य डॉ. मोहन काळे, ज्योविस आयुर्वेदच्या डॉ. ज्योती सातपुते, डॉ. राज सातपुते, तुकाराम सुर्वे प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे, सचिव मनीषा सुर्वे आदींच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. संपूर्ण सप्ताहभर वृक्षारोपण करून त्याचे संवर्धन करण्याचा संकल्प करण्यात आला. वृक्षसंवर्धनासाठी शिक्षक व विद्यार्थी वृक्ष दत्तक घेणार आहेत.



## जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप

# अविनाश साबळेची फायनलमध्ये धडक

### मुरली श्रीशंकरही चमकला

**मुंबई : प्रतिनिधी**

बीडच्या गावखेड्यातील धावपटू अविनाश साबळे यांनी पुन्हा एकदा अटकेपार झेंडा फडकवला आहे. अविनाश आणि मुरली श्रीशंकर या भारतीय स्टार खेळाडूंनी जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये अंतिम फेरीत धडक मारली आहे.

अविनाश तीन हजार मीटर स्टीपलचेजच्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरला आहे. त्याने त्याच्या हीटमध्ये ८ मिनिटे १८.७५ सेकंद वेळ नोंदवत तिसरे स्थान पटकावले. या २७ वर्षीय खेळाडूच्या नावावरही राष्ट्रीय विक्रम आहे. जूनमध्येच त्याने डायमंड लीगमध्ये ८ मिनिटे १२.४८ सेकंद अशी वेळ नोंदवून विक्रम केला होता.




याचबरोबर पुरुषांच्या लांब उडीत श्रीशंकरने अंतिम फेरी गाठली आहे. प्रियांका गोस्वामीने महिलांच्या २० किमी शर्यतीच्या चालण्याच्या अंतिम फेरीत ३४वे स्थान पटकावले, तर संदीप कुमार पुरुषांच्या ४०व्या स्थानावर राहिला.

अविनाशव्यतिरिक्त नीरज चोप्रा देखील जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये भारताची सर्वांत मोठी आशा आहे. ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता नीरजही या वेळी उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. गेल्या महिन्यात नीरजने स्टॉकहोम डायमंड लीगमध्ये ८९.९४ मीटर फेक करून राष्ट्रीय विक्रम मोडला होता.

## सिंगापूर ओपन : सिंधू फायनलमध्ये

**सिंगापूर** : भारताची दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधूने सिंगापूर खुल्या टेनिस स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. तिने सेमीफायनलमध्ये जपानच्या साईना कावाकामीचा पराभव केला. सिंधूने हा सामना २१-१५, २१-७ असा सरळ गेममध्ये जिंकला. या हंगामात सिंधूने सयेद मोदी आंतरराष्ट्रीय स्पर्धा आणि स्विस ओपन अशी दोन सुपर ३०० टायटल जिंकली आहेत.

कावाकामीविरुद्धच्या हेड टू हेड सामन्यात सिंधू २-०ने आघाडीवर होती. कावाकामीसोबत ती २०१८मध्ये चायना ओपनमध्ये खेळली होती. कावाकामीने २०१९मध्ये ऑरलान्स मास्टर जिंकली होती, तर स्विस ओपनमध्ये अंतिम फेरीत धडक मारली होती.






## कर्जत येथे जिल्हा कॅरम निवड चाचणी स्पर्धा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचे माजी कार्यवाह स्व. नथुराम पाटील यांच्या स्मरणार्थ २३ व २४ जुलै रोजी जिल्हा कॅरम अजिंक्यपद व निवड स्पर्धा कर्जत येथे आयोजित करण्यात आली आहे.



रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनतर्फे कर्जत दहिवली येथील भवनात ही स्पर्धा खेळवली जाणार आहे. पुरुष एकेरी, महिला एकेरी, वयस्कर पुरुष अशा तीन गटांत स्पर्धा खेळविण्यात येणार आहे. महिला एकेरी व प्रौढ गट पुरुष स्पर्धा २४ जुलै रोजी खेळविण्यात येणार आहे. या स्पर्धेतून रायगडचे संघ निवडण्यात येणार आहेत. हे संघ पुढील महिन्यात होणाऱ्या ५६व्या सिनियर राज्य कॅरम स्पर्धेत सहभागी होतील.

स्पर्धेकरिता रोख बक्षीसे व आकर्षक चषक देण्यात येणार आहेत. स्पर्धेची प्रवेश फी खेळाडू नोंदणीसह २०० रुपये आहे. स्पर्धेत नाव नोंदविण्याची अंतिम तारीख १९ जुलै आहे. नाव नोंदविण्यासाठी दीपक साळवी-पोयनाड (७०२०६०२३३५), सचिन नाईक-पनवेल (९२२२१७१२६०), पांडुरंग पाटील-कर्जत (७५१७५७०८०५), मनीष जोशी-महाड (८८३०३८७६६९), अमित यादव-रसायनी (९८२२७९१५२०) यांच्याशी संपर्क साधावा.

स्पर्धेकरिता रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनतर्फे खेळाडूंना दोन्ही दिवस दुपारच्या भोजनाची मोफत व्यवस्था करण्यात आलेली आहे. स्व. नथुराम पाटील पाटील यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत जिल्ह्यातील जास्तीत जास्त कॅरमपटूंनी सहभाग घ्यावा, असे आवाहन रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश तुळपुळे व कार्यवाह दीपक साळवी यांनी केले आहे.

## महा स्विम ग्रँड प्रिक्स २०२२ लॉन्च; सहा शहरांत होणार जलतरण स्पर्धा




**दुबई : वृत्तसंस्था**

भारतातील पहिला महा स्विम ग्रँड प्रिक्स २०२२चा शुभारंभ विशेष पोलीस महानिरीक्षक कृष्ण प्रकाश यांच्या हस्ते खारघर येथे करण्यात आला. महाराष्ट्रातील जागतिक पातळीवरील स्पर्धात्मक जलतरण प्रतिभा ओळखण्यासाठी, जोपासण्यासाठी आणि निर्माण करण्यासाठी ॲक्टीओस्पोर्ट, एलिट स्पोर्ट्स प्रोफेशनल्सचा ब्रँड, स्विमिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या संलग्नतेने स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. मुंबई, नाशिक, नागपूर, पुणे, कोल्हापूर आणि औरंगाबाद येथे एकाच वेळी ही स्पर्धा होईल.

या वेळी इएसपीचे ॲक्टीओस्पोर्ट् संचालक केविन मायकल, राज्य शासनाच्या क्रीडा विभागाचे माजी सहसंचालक डॉ. जयप्रकाश दुबळे, महाराष्ट्र जलतरण संघटनेचे माजी सहकारी किशोर शेट्टी, इलाईट स्पोर्ट्स प्रोफेशन प्रायव्हेट लिमिटेडचे राहुल अशोक साखरे आदी उपस्थित होते.

## शरीरसौष्ठव स्पर्धेसाठी भारताचा जम्बो संघ मालदीवमध्ये दाखल

**माफुशी (मालदीव) : वृत्तसंस्था**

आशियाई शरीरसौष्ठव अजिंक्यपद स्पर्धेसाठी भारताचा ८१ सदस्यीय जम्बो संघ मालदीवमध्ये पोहचला आहे.

'भारत श्री' महेंद्र चव्हाण असो किंवा मास्टर्स चॅम्पियन सुभाष पुजारी, मंजिरी भावसार असो किंवा अदिती बंब एकापेक्षा एक महाराष्ट्राचे खेळाडू भारताचा तिरंगा फडकाविण्यासाठी मालदीवच्या भूमीत दाखल झाले आहेत आणि ते निश्चितच अभिमानास्पद कामगिरी करतील, असा विश्वास महाराष्ट्र शरीरसौष्ठव संघटनेचे सरचिटणीस ॲड. विक्रम रोठे यांनी व्यक्त केला आहे.















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com